


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६५ वे * अंक ७६ * नांदेड * रविवार, दि. २२ मार्च २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# समुद्री मार्ग खुले ठेवा, व्यापारात अडथळे नकोत; मोदींचे इराणच्या राष्ट्राध्यक्षांना शांततेचे आवाहन

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** पश्चिम आशियामध्ये इस्रायल, अमेरिका आणि इराण यांच्यातील तणाव शिगेला पोहोचला असताना, भारताने या वादात शांतता प्रस्थापित करण्यासाठी मोठे राजनैतिक पाऊल उचलले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी इराणचे राष्ट्राध्यक्ष डॉ. मसूद पेजेश्कियन यांच्याशी फोनवरून सविस्तर चर्चा केली.

गेल्या आठ दिवसांतील या दोन्ही नेत्यांमधील ही दुसरी चर्चा असून, भारताने या प्रदेशातील शांतता आणि स्थिरतेसाठी पुन्हा एकदा आग्रही भूमिका मांडली आहे. पंतप्रधान मोदींनी राष्ट्राध्यक्ष पेजेश्कियन यांना ईद-उल-फितर आणि इराणचे नवीन वर्ष नवरोज निमित्त शुभेच्छा दिल्या. 'हा सण पश्चिम आशियात शांतता, स्थिरता आणि समृद्धी घेऊन येईल,' अशी आशा पंतप्रधान मोदींनी यावेळी व्यक्त केली. या शुभेच्छांसोबत पंतप्रधान मोदींनी पश्चिम आशियात बिघडत चाललेल्या सुरक्षा व्यवस्थेवर तीव्र चिंता व्यक्त केली.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या संवादादरम्यान पश्चिम आशियातील बिघडत चाललेल्या परिस्थितीवर भारताची भूमिका अत्यंत स्पष्टपणे मांडली. त्यांनी प्रामुख्याने प्रादेशिक सुरक्षा, जागतिक व्यापार आणि मानवी हित या तीन गोष्टींवर भर दिला. पंतप्रधानांनी पश्चिम आशियातील महत्त्वाच्या पायाभूत सुविधांवर होणाऱ्या हल्ल्यांचा तीव्र निषेध केला. अशा हल्ल्यांमुळे केवळ प्रादेशिक स्थिरता धोक्यात येत नाही, तर जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत होऊन जगाच्या अर्थव्यवस्थेवरही विपरीत परिणाम होतो, असे त्यांनी नमूद केले. तसेच होर्मुझची सामुद्रधुनी हा समुद्री मार्ग सुरक्षित राहणे अनिवार्य असल्याचे मोदींनी सांगितले. युद्धामुळे होणारी निष्पाप नागरिकांची जीवितहानी आणि मालमत्तेच्या नुकसानीबद्दल पंतप्रधानांनी खोलवर दुःख व्यक्त केले. या कठीण काळात इराणमधील भारतीय नागरिकांची सुरक्षा आणि त्यांचे हित ही भारताची सर्वोच्च प्राथमिकता असल्याचे त्यांनी पुन्हा एकदा स्पष्ट केले.

पश्चिम आशियातील संकट ओळखून पंतप्रधान मोदी सातत्याने जागतिक नेत्यांच्या संपर्कात आहेत. शुक्रवारी त्यांनी बहरीनचे राजे हमद बिन ईसा अल खलिफा यांच्याशी चर्चा केली होती. यापूर्वी त्यांनी कतारचे अमीर, जॉर्डनचे राजे आणि फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्याशीही संवाद साधला आहे. कोणताही वाद हा केवळ संवाद आणि मुत्सद्देगिरीनेच सुटू शकतो, हे भारताचे अधिकृत धोरण असल्याचे सांगितले जात आहे.

# वाजेगाव परिसरात दुचाकीच्या स्फोटात पेटलेल्या अनोळखी तरुणाचा मृत्यू

## फॉरेन्सिक लॅबने घेतले घटनास्थळावरील नमुने

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील देगलूर नाका परिसरात ईदगाह मैदानापासून जवळच असलेल्या एका पुलाजवळ एका युवकाचा दुचाकीने पेट घेतल्यानंतर स्फोट होऊन संशयास्पदरित्या जळून मृत्यू झाला. सदर स्फोटामुळे वेगवेगळे तर्क-वितर्क काढण्यात येत आहेत. घटनास्थळी वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी भेट दिली. त्यानंतर फॉरेन्सिक लॅब टीमने तेथील काही संस्थास्पद वस्तू ताब्यात घेतल्याचे सांगण्यात आले आहे. मयत झालेल्या युवकाची अद्याप ओळख पटली नसल्याचे पोलिसांनी सांगितले.



नांदेड शहरातील देगलूर नाका येथील ईदगाह मैदानावर ईदची नमाज सुरू होती. याचवेळी वाजेगाव ते ईदगाह मैदानाकडे जाणाऱ्या रस्त्यावर एका पुलावर दुचाकीला अचानक आग लागली. या आगीत स्फोटाचे मोठे आवाज होत होते असे प्रत्यक्षदर्शिनींनी पोलिसांना सांगितले. आगीच्या ज्वालामध्ये दुचाकी चालक ९० टक्के भाजला होता. नांदेड ग्रामीण पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर व त्यांची टीम त्या ठिकाणी पोहोचून गंभीर भाजलेल्या अनोळखी युवकास तातडीने विष्णुपुरी येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले, मात्र त्याच्यावर उपचार सुरू करण्यापूर्वीच मृत्यू झाल्याचे रुग्णालय सूत्राने सांगितले.

सदर घटनेची माहिती चिंचोलकर यांनी वरिष्ठांना दिल्यानंतर पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी (इतवारा) प्रशांत शिंदे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय हे आपल्या टीमसह दाखल झाले. त्यानंतर घटनास्थळी फॉरेन्सिक लॅबच्या टीमलाही बोलावून घेण्यात आले. फॉरेन्सिकच्या कर्मचाऱ्यांनी काही संस्थास्पद वस्तू आपल्या ताब्यात घेतल्याचे सांगण्यात आले आहे.

या प्रकरणाची कसून चौकशी करण्याच्या सूचना पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी यंत्रणेला दिल्या आहेत. नांदेड पोलिसांनी दुचाकीची संशयास्पद आगीची गंभीर दखल घेतली असून सर्व दृष्टीने त्यांची चौकशी करण्यात येत आहे. घटनास्थळी पोलिस अधिकारी तसेच दहशतवाद विरोधी पथकाने भेट देऊन पाहणी केली. मयत व्यक्ती नेमका कोण आहे? याची अद्याप ओळख पटली नसल्याचे पोलिसांनी सांगितले.

# केंद्राकडून व्यावसायिक गॅस वाटपात वाढ

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** पश्चिम आशियातील युद्धामुळं देशात निर्माण झालेल्या ऊर्जा संकटाच्या पार्श्वभूमीवर, सरकारने एक मोठा निर्णय घेतला आहे. २३ मार्चपासून, केंद्रशासित प्रदेशांना होणारा गॅसचा पुरवठा ५० टक्क्यांपर्यंत वाढवण्यात आला आहे. तर राज्यांना होणारा व्यावसायिक गॅसचा पुरवठा २० टक्क्यांनी वाढवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

सरकार पीएनजी पाईपद्वारे पुरवल्या जाणाऱ्या नैसर्गिक वायूकडे वळण्यासही प्रोत्साहन देत आहे. यासाठी एक अनिवार्य नोंदणी प्रक्रिया राबवली जात आहे. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या मते, हा अतिरिक्त २० टक्के एलपीजी सर्वाधिक गरज असलेल्या क्षेत्रांना प्राधान्याने वाटप केला जाईल. यामध्ये रेस्टॉरंट्स, ढाबे, हॉटेल्स, औद्योगिक कॅन्टीन, अन्न प्रक्रिया आणि दुग्ध युनिट्स, सरकारी अनुदानित कॅन्टीन, सामुदायिक स्वयंपाकघर आणि स्थलांतरित कामगारांसाठी ५-किलोचे सिलिंडर यांचा समावेश आहे.

केंद्र सरकारने राज्यांना मिळणाऱ्या व्यावसायिक गॅसच्या वाटपात २० टक्क्यांनी वाढ केली आहे. राज्यांना आता व्यावसायिक एलपीजीचा अतिरिक्त २० टक्के वाटा मिळणार असून, त्यामुळे एकूण पुरवठा ५० टक्क्यांवर पोहोचेल. रेस्टॉरंट, हॉटेल, ढाबे आणि उद्योगांना प्राधान्य दिले जाईल. एलपीजी मिळवण्यासाठी नोंदणी आणि पीएनजीसाठी अर्ज करणे आवश्यक असणार आहे.

मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, केंद्र सरकारच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार २० राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांनी गैर-घरगुती एलपीजीच्या पुरवठ्यासाठी आदेश जारी केले आहेत. उर्वरित राज्यांना सार्वजनिक क्षेत्रातील तेल कंपन्या व्यावसायिक एलपीजी सिलिंडर पुरवत आहेत. गेल्या आठवड्यात अंदाजे १३४७९ मेट्रिक टन एलपीजी सिलिंडरचा पुरवठा करण्यात आला आहे.

# सोने ४ हजार तर चांदी ६ हजार रूपयांनी स्वस्त



**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** शुक्रवारी जळगाव सुवर्ण नगरीमध्ये सोन्याचे दर जीएसटी शिवाय १, ४८, ००० असताना शनिवारी त्यामध्ये चार हजार रुपयांची घसरण होऊन हेच दर १, ४४, ००० वर खाली आले आहेत. तर चांदीच्या दरात देखील सहा हजार रुपयांची घसरण होऊन चांदीचे दर हे २, ३६, ००० वरून २, ३०, ००० इतके खाली आले आहेत. युद्धाची तीव्रता अशीच कायम राहिली तर सोने चांदीच्या दरात अजूनही घसरण होण्याचा अंदाज सुवर्ण व्यावसायिक व्यक्त करत आहेत.

गेल्या काही दिवसांत आखाती देशात सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीचा परिणाम हा संपूर्ण जगाच्या विविध क्षेत्रात पडत आहे. डॉलर इंडेक्स दिवसागणिक वाढत असताना रुपयाची निच्चांकी पातळीवरील घसरणमुळे सोन्याच्या दरात घसरण होत असल्याचे पाहायला मिळाले.

# १ एप्रिलपासून नव्या आयकर कायद्याची अंमलबजावणी

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** सेंट्रल बोर्ड ऑफ डायरेक्ट टॅक्स यांच्याकडून आयकर कायदा २०२६ नोटिफाय करण्यात आला आहे. १ एप्रिल २०२६ पासून या कायद्याची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. नव्या आयकर कायद्यामुळं घरभाडे भत्ता, इतर भत्ते आणि कर यासंदर्भात बदल होणार आहेत. ते बदल जाणून घेणं आवश्यक आहे.

ओल्ड टॅक्स रिजीमनुसार मुंबई, दिल्ली, कोलकाता, चेन्नई, हैदराबाद, पुणे, अहमदाबाद आणि बंगळुरु सारख्या काही शहरांना उच्च घरभाडे भत्ता सूट यामधये ठेवलं जाईल.या शहरात राहणारे व्यक्ती त्यांच्या पगाराच्या ५० टक्के रक्कम घरभाडे भत्ता सूट म्हणून दावा करु शकतात. इतर शहरांमध्ये ही रक्कम ४० टक्क्यांपर्यंत क्लेम करता येईल. न्यू टॅक्स रिजीममध्ये घरभाडे भत्ता यावर सूट उपलब्ध नाही.

नव्या नियमांनुसार मुलांच्या शिक्षणासाठीचा भत्ता १०० रुपयांवरुन वाढवून ३००० रुपये महिना करण्यात आला आहे. जो दोन मुलांपर्यंत लागू असेल. याशिवाय हॉस्टेल खर्च भत्ता ३०० रुपयांवरुन वाढवून ९००० रुपये महिना करण्यात आला आहे.

सफाई कर्मचारी, बागकाम करणारे कर्मचारी किंवा सुरक्षा रक्षक यासारख्या सेवांसाठी खर्च केलेल्या वेतनाच्या रकरमेवर कर लागू असेल यामध्ये कर्मचाऱ्याकडून वसूल केलेली कोणतीही रक्कम कमी केली जाईल.

ऑऊटसोर्सिंग करुन मिळालेला गॅस, वीज किंवा पाणी यासाठी खर्च केलेली रक्कम करपात्र असेल. यासाठीचा खर्च कंपनीकडून त्यांच्या स्वत:च्या संसाधनातून पूर्ण केला असेल तर कराची मोजणी प्रति यूनिट उत्पादनाच्या आधारवर केली जाईल.

एखाद्या आर्थिक वर्षात याची किंमत १५००० रुपयांपेक्षा अधिक होत असेल तर ही करपात्र रक्कम असेल.

कामाच्या वेळी दिल्या जाणाऱ्या मोफत जेवण आणि पेय पदार्थ, कॅश व्हाऊचरद्वारे दिल्यास ते करमुक्त असतात. मात्र, ही रक्कम २०० रुपयांपेक्षा अधिक असू नये. नव्या नियमानुसार कर्मचाऱ्यांच्या शासकीय वाहनांच्य वापरावर अधिक लाभ उपलब्ध आहे.

# अमेरिकेचा यू टर्न! इराणी तेल विकत घेण्यास ३० दिवसांची परवानगी

**मुंबई (प्रतिनिधी)–** अमेरिकेने इराणच्या कच्च्या तेलाची तात्पुरती विक्री आणि वितरणास अधिकृत मान्यता दिली आहे. ही परवानगी तात्पुरती असून या तेलाच्या विक्रीतून मिळणारा पैसा इराणला थेट लष्करी कारवायांसाठी वापरता येणार नाही, यावर अमेरिकेचे नियंत्रण असेल. विशिष्ट देशांना किंवा कंपन्यांनाच हे तेल खरेदी करण्याची मुभा देण्यात आली आहे. युद्धामुळे विस्कळीत झालेला पुरवठा पूर्ववत करण्यासाठी समुद्रात जहाजांवर असलेले सुमारे १४ कोटी बॅरल तेल जागतिक बाजारात आणण्याचा अमेरिकेचा प्रयत्न आहे.

# नांदेडमध्ये रमजान ईद उत्साहात साजरी; ईदगाह मैदानावर केला नमाज अदा




**नांदेड (प्रतिनिधी)–** शनिवार, दि. २१ मार्च रोजी ईद- उल- फित्र (रमजान ईद) हा सण अत्यंत उत्साहात मुस्लिम धर्मियांनी साजरा केला. सकाळी ९ वाजता नांदेड शहरासह जिल्ह्यातील सर्व ईदगाह मैदानावर सार्वजनिक प्रार्थना (नमाज) अदा करण्यात आली आणि एकमेकांची गळाभेट घेत शुभेच्छा देण्यात आल्या.

मागील महिन्याभरापासून पवित्र रमजान महिन्यात उपवास (रोजा) करुन प्रार्थना केली जाते. यात अबालवृद्धापासून ते लहान बालकांपर्यंत उपवास केला जातो. त्यानुसार मुस्लिम बांधव सकाळी सुर्योदयाअगोदर भोजन करून प्रार्थनेला जात होते आणि नंतर दिवसभर पाण्याचा एक थेंब न पिता दुपारच्या प्रार्थनांना सुध्दा हजेरी लावत होते. सायंकाळी सुर्योदयासह इफ्तार केला जात असे आणि त्यानंतरच्या प्रार्थनांमध्ये मुस्लिम समाज सहभागी होतो. शुक्रवारी सौदी अरब देशात चंद्र दिसला आणि शनिवारी त्यानुसार ईद साजरी झाली.

यावेळी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, उपविभागीय पोलिस अधिकारी प्रशांत शिंदे, रामेश्वर व्यंजने यांच्यासह पोलीस निरीक्षक रामदास शेंडगे, राजेश पुरी, संतोष तांबे, परमेश्वर कदम, ओमकांत चिंचोलकर आणि रामेश्वर खनाळ यांनी शहरातील आपल्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या मुस्लिम बांधवांना गुलाबपुष्प देऊन रमजान ईदच्या शुभेच्छा दिल्या.




# केंद्र सरकारचा बेटिंग आणि जुगाराच्या ॲप्सवर स्ट्राईक

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** देशातील वाढत्या बेकायदेशीर ऑनलाइन जुगार आणि सट्टेबाजीच्या प्रकारांना आळा घालण्यासाठी केंद्र सरकारने आता अत्यंत कठोर पाऊल उचलले आहे. माहिती आणि तंत्रज्ञान मंत्रालयाने एका मोठ्या कारवाईत ३०० हून अधिक बेकायदेशीर बेटिंग वेबसाईट्स आणि मोबाइल ॲप्सवर बंदी घातली आहे. केंद्र सरकारच्या या धडक कारवाईमुळे ऑनलाइन जुगार चालवणाऱ्या जाळ्यांचे कंबरडे मोडले असून, डिजीटल माध्यमांतून होणाऱ्या आर्थिक फसवणुकीला लगाम बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

केंद्र सरकारकडून बेकायदेशीर सट्टेबाजींविरोधातील मोहीम गेल्या काही काळापासून सातत्याने राबवली जात आहे. या मोहिमेअंतर्गत आतापर्यंत ८ हजार ४०० वेबसाईट्सवर कारवाई करण्यात आली आहे. विशेषतः सरकारने लागू केलेल्या नवीन 'ऑनलाइन गेमिंग' नियमानंतर ही प्रक्रिया अधिक गतिमान झाली आहे.

# सनदी अधिकाऱ्यांच्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन अध्यक्षपदी लीना मेहेंदळे



**मुंबई (प्रतिनिधी)–** नवी दिल्ली येथे आयोजित महिला शासकीय अधिकाऱ्यांच्या पहिल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवृत्त सनदी अधिकारी लीना मेहंदळे यांची एकमताने निवड करण्यात आल्याची घोषणा संमेलनाच्या निमंत्रक महाराष्ट्र सदनच्या निवासी आयुक्त आर. विमला तसेच स्वागताध्यक्ष सुप्रिया देवस्थळी यांनी केली.

सरहद संस्था, पुणे आणि नवीन महाराष्ट्र सदन यांच्या संयुक्त विद्यमाने आणि मराठी भाषा विभागाच्या सहकार्याने हे दोन दिवसीय संमेलन ११ व १२ एप्रिलला होणार आहे. छत्रपती महाराणी ताराराणी यांच्या ३५१ व्या जयंतीचे औचित्य साधून या संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. भारतीय प्रशासकीय सेवेतील १९७४ बॅचच्या लीना मेहेंदळे यांचा जन्म जळगांव जिल्ह्यातील धरणगांव येथे झाला. त्या महाराष्ट्र राज्याच्या अतिरिक्त मुख्य सचिव सामान्य प्रशासन या पदावरून निवृत्त झाल्या आहेत. त्यांनी गोवा राज्याच्या मुख्य माहिती अधिकारी पदाची जबाबदारीही सांभाळली आहे. महसूल, प्रशासन, प्रशासकीय कायद्याची अंमलबजावणी, विकास प्रशासन, कार्यालयीन कामकाजात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर असे सर्वच महत्वाचे विषय त्यांनी हाताळले आहेत. त्यांनी राज्य तसेच राष्ट्रीय पातळीवर अनेक महत्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत.




***** शुभेच्छूक *****

ॲड.गजानन कदम (उच्चन्यायालय,छ.संभाजीनगर), ॲड.डी.जी.शिंदे, ॲड.जी.के.पोफळे, ॲड.सय्यद अरिबोद्दीन, ॲड.अमरिकसिंघ वासरीकर, ॲड.श्याम बन, ॲड. अविनाश कदम, ॲड. फेरोजा खान, ॲड.सुनील पास्टेकर, ॲड. ज्योती घुगे, ॲड.शिवराज पाटील, ॲड.जितेंद्र पांडे, ॲड.देवयानी पांडे, ॲड.संभाजी सुर्यवंशी, ॲड.रणजीतसिंघ बैस, ॲड.शालीनी शिंदे, ॲड.शिला शिंदे, ॲड.संतोष इंगळे, ॲड.सी.डी.इंगळे, ॲड.एस.जी. कदम, ॲड.सॅमसन करकरे, ॲड.एस.टी.वडजे, ॲड.महेश महाजन, ॲड.अविनाश काळे, ॲड.शशीकांत तुप्तेवार, ॲड. अवधुत लोमटे, ॲड.नंदकिशोर कल्याणे, ॲड.व्ही.बी.कदम, ॲड.दिनेश जोशी, ॲड. अनिता पवार, ॲड.हर्षल सुर्यवंशी (मुंबई), ॲड.सिद्धार्थ कोंडलवार, ॲड. अर्चना घोरपडे, ॲड.करुणा कांबळे, ॲड.एस.एस.कुंटे (भोकर), ॲड.के.एम.क्षिरसागर, ॲड.दिगांबर सुर्यवंशी (हदगाव), ॲड.एन.बी.पंडीत, ॲड.जयेश पाटील, ॲड.सुजाता बगाटे, ॲड.आरती जोमेगावकर, ॲड.गया निवडंगे, ॲड.एम.डी. अर्शद, ॲड.गजानन पवार, ॲड. अशिष ढाणकीकर, ॲड.शिवहार पाटील वाडीवाले, ॲड. अशित चंदनशिवे, ॲड.रमेश धात्रक, ॲड.एस.जी.साखरे, ॲड.शिवकुमार शिंदे, ॲड.विक्रमराजे शिंदे, ॲड.प्रतिभा सूर्यवंशी, ॲड.राहूल पेटकर, ॲड.सुमंत लाठकर, ॲड.संजय उदावंत, ॲड. गजानन सूर्यवंशी, ॲड.जवादवार, ॲड.ज्योती कोंडलवार, ॲड.गजानन गव्हाणे, ॲड.सुमेध सोनकांबळे, ॲड.नातेवाड, ॲड.अमोल कदम, ॲड.दिलीप गंगातिरे, ॲड.रुपाली टेहरे, ॲड.अभिषेक तपकी, ॲड.गणेश तिडके, ॲड.तिलेवाड,ॲड. अजित मावलीकर, ॲड.पिराजी कदम, ॲड.प्रवीण गुट्टे, ॲड.विशाल दंडवे, ॲड.गजानन कसेवाड, ॲड.शेखर कुंटे, ॲड.नागेश कदम, ॲड.विकास शिंदे, ॲड.कपील कावळे, ॲड.उदय बडगे, ॲड.अदिनाथ चव्हाण, ॲड.श्रीनिवास जाधव, ॲड.उस्मान तांबोळी, ॲड. आम्रपाली हिंगोले, ॲड.कोमल जाधव, ॲड.स्मिता पालवे(पुणे), ॲड.एम.एम.गोरे, ॲड.मुक्ता गोरे, ॲड.उमा पत्तेवार, ॲड. अजय वाघमारे(मुंबई), ॲड.सुरेखा येरपडवार, ॲड.दिगांबर येताळकर, ॲड.वैषाली जाधव, ॲड.डी.बी.चंद्रवंशी, ॲड.नागनाथ भोसले, ॲड.स्नेहल देशमूख, ॲड.बालाजी कदम, ॲड. शे.इम्रान, ॲड.स्वप्नाली फुके, ॲड अनघा रुद्रावार, ॲड. पी.एस.पवार, ॲड. राजेश्वर देशपांडे, ॲड. रमेश माने, ॲड. माधव पा. लोहगावकर, ॲड. ओमकार वसमतकर, ॲड. रामेश्वर डिकळे पाटील, फारुखी मोईज.

प्रकाशक: किशनराव कासराळीकर , अक्षय बलखंडे (+919130806309)

वऱ्हाडी कथा

# म्हताऱ्या लोकायचं दुसरं घर...

कोई भी आवो समा लेती है यह बंबई. भूका ऊठाती है लेकीन सुलाती नही है यह मुंबई.

मुंबई मेरी जान .. आमची मुंबई.. जीवाची मुंबई...

अस लय आदरानं म्हतल्या जाते ह्या मुंबापुरीले. मुंबई धावती हायं. तीले विसावा नाही. रातच्या एक वाजेपर्यंत लोकल धावत,पयत असते. लोक तीन घंटे घरात अन तीन तास लोकल मंधी आपली झोप पुरी करतात. लोक घरून जातात तव्हा लेकर झोपलेली असतात . अन घरी येतात तव्हा ही लेकरं झोपलेलीच असतात. हप्त्यातून एक डावच बाप लेकरायले डोयानं घरात दिसते. तव्हा लेकर बापाले एक भावूक होवून सवाल करतात.

बाबा आठवडाभर कुठे होता हो तुम्ही.

अशी हे जिंदगी अवघी धावपळीत सरून जाते . बाप दिवसरात्र लेकरायसाठी मेहनत करतो . जर माय अन बाप दोघही कामाले जात असतीन त कामाले जातानी कोंबळ्या जश्या खुराळ्यात कोंडतात तसे लेकर घरात कोंडले जातात. हे लेकर दिवसभर बाहेरून लावलेल्या कुलूपबंद खोलीत खेयतात, टिव्ही पाह्यतात, जे खा ले मायनं ठेवल अशीच थे खातात. तेयच्या मनात मायबापाईषयी एक प्रकारची अनामिक घृणा, राग तयार होत राह्यत असते. कारण आजी अन आबा घरात जागा नसल्यानं वृद्धाश्रमात ठेवले जातात. विभक्त कुटुंब पध्दती रूढ होत जाते. हेच लेकर जवा शिकून सवरून मोठे होतात . तव्हा हे लेकर विदेशात जातात अन तेयले माय बापा विषयी मनात काहीच मया, दया, करूना ऊरत नाह्यी. वृद्धाश्रमात कोन असते त लय शिकलेल्या लेकरायचे माय बाप. म्या त कधीच आयकल नाह्यी बुवा की , मजूराचे , शेतकऱ्याचे , हातमजूरी करणाऱ्या लोकायचे मायबाप वृद्धाश्रमात हायेत म्हनून . मी त अस म्हनीन लेकरायले शिकवा मोठ करा पन त्याच बरोबर तेयले आपली संस्कृती शीकवा , संस्कार रूजवा. ज्या देशात मायबापाले देव मानल्या जाते तिथं हे वृद्धाश्रम काहाले तयार होवून राह्यले हो ! ज्यान आपल्यासाठी हाळाचे काळ केले. रगताच पानी केलं. आयुष्यभर आपल्यासाठी जिनगानी केली. जो निरंतर न थांबता धावत होता तीय तुटत होता. आज तेयची दिवाई, दसरा, होई ह्या वृद्धाश्रमात होवून राह्यली. काल परवा गोठ. बदलापूरच्या 'सहवास' वृद्धाश्रमात कवितेचा कार्यक्रम 'सूर नव्या मैफिलीचे' मार्फत आयोजित करण्यात आला होता . मी काव्य गायनाले गेलो .हेरेकाच्या डोयात अतृप्त सपनाचा नजारा अन सन्नाटा पाह्यला कायीज हादरून गेल, पिळवटून गेल. तेयच्या जगन्यात ऊर्मी , ऊर्जा निर्माण व्हाव म्हनून म्या एक कविता सादर केली ...




गीत
चाल - खरा तो एकची धर्म
जगा रे हसत खेळावे
दुःखाने दुःख करावे... !!धृ. !!
असू द्या मुखावरती हासू
हसावे डोळ्यातील आसू
संकटांनी दुर पळावे
जगा रे, हसत खेळावे..!!१!!
असे हे बहुमोल जीवन रे
हर दिवसाचा करा सण रे
नदी प्रमाणे खळखळावे
जगा रे , हसत खेळावे...!!२!!
कशाला मरणाची घाई
बघ रे त्या फुलणार्या जाई
ऊगा का हळहळावे
जगा रे, हसत खेळावे...!!३!!
सांगे तो सुर्य आपूला
जो ऊगला तो मावळला
सह्याद्रीत धडधडावे
जगा रे हसत खेळावे...!!४!!

हे कविता म्हतल्यावर तेयचे डोये चमकले. तेयच्या तोंडावर फुललेल्या कापसाच्या बोंडीवानी हासू पसरल.

मंग मले दुसरी कविता म्हनासाठी कवी सागरराजे निंबाळकर ययन माईक देला तव्हा....

'वृद्धाश्रम'
नोको नोको रे पोरा
वृद्धाश्रमात ठेवू
आम्ही नवरा बायको
शीयपातच खावू...
तुह्ये लेकर मांडीशी
खेवावयाचे रे हायं
किती नाजूक कयी
तुह्यी जन्मदाती मायं...
नाह्यी मांगन पानाले
नाही काथ न चुन्याले
तुह्या बेंबीशी जुयली
नाय नोको करू वाले..
घराच्या थ्या ओसरीत
आम्ही राहू रे पळून
नाह्यी करनार हट्ट
येते पोट हे खळ्ळून...
कोन्या होई दिवाईले
नोको घेवू लुगळ, धोतर
नोको देवू गोळधोळ
खाऊ आम्ही रे मातेरं...
मरताना तोंडी माह्या
पळो तुह्या हातच रे पानी
भेटो दोन घळी साठीच
मरताना तुह्यी मांडी...
तुह्यी माय रे हवले
जशी जुईची थे कई
तयहातच्या फोळावानी
जपनारी तुहयी आई...
सार इसरला आता
नाही घरामंधी जागा
तुह्ये पोर असे ना करो
जरा संभावून वागा...
आम्ही चाललो सोळून
पोरा आता नोको झुरू
आम्ही मेलो जरी रसत्यात
आमच पीत्तरपाठ नोको करू..

हे कविता वऱ्हाडी बोलीत होती पन तेयले समजली. काहीजन त टपटप लळले. कार्यक्रमाचा समारोप झाला. मी तिथून निंघालो पन थे सुरकुतलेले चेहरे मनात घेऊन आलो....

**-सु. पुं. अढाऊकर.**
अकोला.
मो. ९८६९२०२५९७

# अॅड. पी. एन. शिंदे : धगधगत्या निष्ठा आणि वकिलीचा मानदंड; सुवर्ण महोत्सवी वर्षाकडे प्रवास



न्यायदानाच्या पवित्र मंदिरात दीर्घ काळ सत्याचा आणि कायद्याचा झेंडा फडकवल्यानंतर, ज्येष्ठ विधीज्ज्ञ अॅड. पी. एन. शिंदे आज आपल्या कारकिर्दीच्या ४९ व्या वर्षात पदार्पण करत आहेत. ही केवळ एक सांख्यिकीय आकडेवारी नसून, एका निष्कलंक चारित्र्याचा, प्रगाढ बुद्धिमत्तेचा आणि सामाजिक बांधीलकीचा एक देदीप्यमान इतिहास आहे.

सुमारे २८ वर्षांपूर्वी जेव्हा मी ज्युनिअर वकील म्हणून अॅड. पी. एन. शिंदे यांच्या चेंबरमध्ये दाखल झालो, तेव्हा माझ्यासमोर भाषेचे मोठे 'चॅलेंज' होते. उर्दू आणि इंग्रजी माध्यमात शिक्षण झाल्याने मराठी भाषेवर पकड नव्हती. परंतु अॅड. पी. एन. शिंदे यांनी एखाद्या पालकाप्रमाणे मला केवळ कायदाच शिकवला नाही, तर मराठी भाषेचे व्याकरण आणि उच्चार शुद्ध करण्यासाठी प्रोत्साहित केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली मी जामीन अर्ज, दोषारोपपत्र आणि उलटतपासणीच्या बारकाव्यांमध्ये मराठीचा जो युक्तीवाद सुरु केला, तो आजही माझ्या व्यावसायिक यशाचा आधारस्तंभ आहे. तब्बल १० वर्षांची प्रदीर्घ ज्युनिअरशिप आणि त्यानंतरची माझी १८ वर्षांची स्वतंत्र वकिली, हा सर्व प्रवास म्हणजे शिंदे साहेबांच्या आशीवार्दाचा 'जजमेंट'आहे.

वकिली व्यवसायाला समर्पित असतानाच साहेबांनी सामाजिक क्षेत्राचा 'चार्ज' घेतला. मराठा महासंघ, लायन्स क्लब आणि बार असोसिएशनचे अध्यक्षपद त्यांनी ज्या ताकदीने भूषवले, तो काळ आजही ऐतिहासिक मानला जातो. राजकारणात ते नेहमीच सक्रिय राहिले, मात्र त्यांनी कधीही सत्तेची खुर्ची मिळवण्यासाठी तत्वांचा बळी दिला नाही.

नांदेडचे शिवसेनेचे पहिले आमदार डॉ. डी. आर. देशमुख यांना प्रस्थापितांच्या विरोधात मैदानात उतरवून त्यांच्या गळ्यात विजयाची माळ घालणारे खरे सूत्रधार अॅड. पी. एन. शिंदे हेच होते. १९९५ मध्ये लोकसभेची उमेदवारी हुकली, तरीही त्यांनी पक्षाशी प्रतारणा न करता डॉ. धनाजीराव देशमुखांचे इमानइतबारे काम केले.

२००३ मध्ये अशोकराव चव्हाणांच्या भेटीनंतर त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. जिल्हा प्रवक्ता आणि विधी विभागाचे अध्यक्ष म्हणून त्यांनी पक्षाची बाजू भक्कमपणे मांडली. मात्र, नियतीचा 'स्टे' म्हणावा की राजकीय खेळी, २००४ मध्ये हदगाव येथुन विधानसभेच्या उमेदवारीचे आश्वासन असूनही त्यांना उमेदवारी नाकारली गेली. वकिलीच्या क्षेत्रात शिखरावर असलेल्या या माणसाला राजकारणाने मात्र उपेक्षित ठेवले, हे कटू सत्य आज आपल्याला मान्यच करावे लागेल.

**परंपरेचा नवा हुंकार**

अॅड. पी. एन. शिंदे यांची ही देदीप्यमान परंपरा पुढे नेण्यासाठी त्यांचे चिरंजीव अॅड. विक्रम राजे शिंदे पूर्णपणे सज्ज झाले आहेत. मागील १० वर्षांपासून त्यांनी अनेक गुंतागुंतीच्या खटल्यांमध्ये कायद्याचा किस पाडत पक्षकारांना न्याय मिळवून दिला आहे. अत्यंत शांत, संयमी आणि अभ्यासू वृत्ती असलेले विक्रमराजे हे आपल्या वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवून वकिलीचा वारसा समर्थपणे पेलत आहेत. अॅड. पी. एन. शिंदे हे केवळ एक वकील नसून ते एक चालते-बोलते 'कायदेपीठ' आहेत. त्यांच्या ४९ व्या वर्षात पदार्पण करण्याच्या या मंगलप्रसंगी मी त्यांना त्रिवार अभिवादन करतो.

**-अॅड. सय्यद अरिबोद्दीन**
माजी उपाध्यक्ष,
नांदेड जिल्हा वकील संघ

## वेदनेचा अबोल हुंकार

कुठवर सोसायचा हा
भीषण वैशाख वणवा
संस्कृतीत पूजा अन्
व्यवहारात माणुसकीची वाणवा
द्रोपदीच्या वस्त्रहरणाचा
सारा दरबार साक्षीला
श्रीकृष्णाचे अस्तित्त्व आता
आधार काळाबरोबर हरपला
आता नाही येणार श्रीकृष्ण
ही संधी ओळखून अत्याचारी
राजरोसपणे मिळून
कळ्या-कुस्करतात व्यभिचारी
कधी निर्भयाची आर्त किंकाळी
माणुसकीनं मान खाली घातली
नित्य अत्याचारानं लक्तरं स्त्री अब्रुची
माणुसकीच्या वेशीला टांगली
अजून किती कळ्या खुडल्या
असतील रात्रीच्या अंधारात
शिताएवढे सत्य म्हणे
येते उजेडात.
माणुसकीची लाज वाटावी
अशी ही असतात का माणसं
क्षणभर देव म्हणावा असेल
मीच निर्मिली का माणसं
पशुसमान जगण्याची रीत
स्त्री-पूजनाचा मूक अंगार
खोट्या प्रतिष्ठेच्या पायी
घुमतो वेदनेचा अबोल हुंकार.

**-अनिता दाने-जुंबाड**
नांदेड
मो. ९३०९९६२३४०

## इचार

मले येते आये,
आता एकच इचार
लोकांत काऊन होत,
आये बिमारीचा संचार ।।१।।
जिकडे जावा तिकडे,
आता आये रोगराई
मग काऊन करत नाई,
गावातली साफसफाई ।।२।।
म्हणतेत बायेरचा काई,
खाल्ला त होते माणूस बिमार
मग कायले करतेत लोक,
जेवणात पैशाची उधळण बेसुमार।।३।।
आये आपल्यावरच आता,
निरोगी रायाची जिम्मेदारी
आपुनच आहोत आपल्या,
निरोगी देहाचे अधिकारी।।४।।

**- प्रिती खोब्रागडे**
रा. गुरढा, ता. लाखनी जि. भंडारा
मो. ७२१९५१५४४८

# डोक्यावरचा हंडा काढा; पाणीपुरवठ्याचे नियोजन करा!

स्वयंपाकापासून ते सांडपाण्यापर्यंत घरात पाणी आहे की नाही हे पाहण्याची जबाबदारी भारतातील पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये पिढ्यानपिढ्या महिलांनी सांभाळली आहे. आजही अनेकांना आपली आई, बहीण किंवा आजी डोक्यावर हंडा, कळशी किंवा घागर घेऊन लांबवरून पाणी आणतानाचे प्रसंग आठवते.भारतात आता हे चित्र कालबाह्य झाले तरी जगभरात अधिकही अनेक देशात नागरिक शुद्ध व नियमित पाणीपुरवठ्यापासून वंचित आहेत. त्यामुळे यंदा २२ मार्चला जागतिक जल दिवस साजरा करताना संयुक्त राष्ट्राने पाणी व्यवस्थापनात महिला सक्षमीकरणाला प्राधान्य दिले आहे.

भारताने पेयजलाच्या क्षेत्रात मोठी प्रगती केली आहे.घराघरांत नळाद्वारे पाणी पोहोचवण्यासाठी जलजीवन मिशन प्रभावीपणे राबविण्यात आले. तरीही काही भागांत पाणीटंचाई कायम आहे आणि त्याचा सर्वाधिक भार महिलांवरच पडतो. ही समस्या केवळ भारतापुरती मर्यादित नसून जागतिक पातळीवरही ती तितकीच गंभीर आहे. म्हणूनच यंदाचा जागतिक जल दिवस पाणी आणि महिला सक्षमीकरण या व्यापक संकल्पनेशी जोडून साजरा केला जात आहे.

**जलसंकट : असमानतेचा प्रश्न**

पृथ्वीवरील सुमारे ७१ टक्के भाग पाण्याने व्यापलेला असला, तरी त्यातील केवळ २.५ टक्के पाणी गोड आहे. त्यातीलही अत्यल्प भाग मानवाच्या वापरासाठी उपलब्ध आहे. त्यामुळे पाण्याची विपुलता ही केवळ भास आहे.

हवामान बदल, लोकसंख्यावाढ, औद्योगिकीकरण आणि शहरीकरण यामुळे पाण्याची मागणी वाढत असताना उपलब्धतेत आणि वितरणात मोठी असमानता निर्माण झाली आहे. या असमानतेचा सर्वाधिक फटका स्त्रिया आणि मुलींना बसतो.

पाणीटंचाईत महिलांचे सर्वाधिक शोषण

संयुक्त राष्ट्रांच्या अहवालांनुसार, जगभरातील १ अब्जाहून अधिक स्त्रिया अजूनही सुरक्षित पिण्याच्या पाण्यापासून वंचित आहेत. सुमारे १.८ अब्ज लोकांच्या घराजवळ पाणी उपलब्ध नाही. अशा परिस्थितीत प्रत्येक तीन घरांपैकी दोन घरांमध्ये पाणी आणण्याची जबाबदारी महिलांवर असते.

५३ देशांतील आकडेवारीनुसार स्त्रिया आणि मुली दररोज एकत्रितपणे सुमारे २५० दशलक्ष तास पाणी आणण्यात खर्च करतात. ही वेळ शिक्षण, रोजगार किंवा वैयक्तिक विकासासाठी वापरता आली असती.





अशुद्ध पाणी आणि स्वच्छतेच्या अभावामुळे दररोज सुमारे १,००० बालकांचा मृत्यू होतो. याशिवाय जगातील सुमारे १४ टक्के देशांमध्ये पाणी व्यवस्थापनाच्या निर्णयप्रक्रियेत महिलांचा समान सहभाग निश्चित करणारी ठोस यंत्रणा नाही.

हे आकडे स्पष्ट करतात की जलसंकट हा केवळ नैसर्गिक प्रश्न नसून तो सामाजिक, आर्थिक आणि लिंगभेद करणारा आहे.

**महिला जलव्यवस्थापनाच्या केंद्रस्थानी हव्यात**

भारतीय संविधानामुळे स्त्री-पुरुष समानतेचा पाया मजबूत झाला आहे.आज महिला उद्योग, शिक्षण, आरोग्य अशा अनेक क्षेत्रांत नेतृत्व करत आहेत. पाणी व्यवस्थापनातही त्यांचा अनुभव अमूल्य आहे.मात्र ही स्त्री समानता आत्ता जलव्यवस्थापनातही आणणे केवळ आपल्याच देशाची नाही तर जगभराची गरज बनली आहे.

संयुक्त राष्ट्रांच्या मते, जलव्यवस्थापनात महिलांचा सहभाग वाढल्यास सेवा अधिक शाश्वत, समावेशक आणि प्रभावी ठरतात. त्यामुळे महिलांना 'पाणी आणणाऱ्या' भूमिकेतून 'पाणी नियोजन करणाऱ्या' भूमिकेत आणणे आवश्यक आहे.

**पाणी आणि अर्थव्यवस्था : अदृश्य नाते**

पाणी हे जीवनाचेच नव्हे तर अर्थव्यवस्थेचेही मूलभूत साधन आहे. जगभरात उपलब्ध शुद्ध पाण्यापैकी सुमारे ७० टक्के पाणी शेतीसाठी वापरले जाते, तर उद्योग आणि ऊर्जा क्षेत्रालाही मोठ्या प्रमाणावर पाण्याची गरज असते.

ज्या देशांनी प्रभावी जलव्यवस्थापन केले, तेथे आर्थिक प्रगती वेगाने झाली. इस्रायलने ठिबक सिंचन, सिंगापूरने सांडपाण्याचा पुनर्वापर, नेदरलँडने पूर नियंत्रण आणि ऑस्ट्रेलियाने जलसंधारण धोरण यशस्वीपणे राबविले. ही उदाहरणे योग्य नियोजनाचे महत्त्व अधोरेखित करतात.

**जागतिक उपाययोजना : बदलाची दिशा**

पाण्याच्या समस्येवर उपाय म्हणून विविध स्तरांवर प्रयत्न सुरू आहेत. समुद्राच्या खाऱ्या पाण्याचे गोड्या पाण्यात रूपांतर (डिसॅलिनेशन), सांडपाणी प्रक्रिया आणि पुनर्वापर, तसेच नदी पुनरुज्जीवन प्रकल्प यांवर भर दिला जात आहे.

महाराष्ट्रातील नागपूर येथे सांडपाण्याचा औद्योगिक वापर केला जातो, तर नवी मुंबईचे सांडपाणी व्यवस्थापन आदर्श मानले जाते. याशिवाय वृक्षारोपण आणि जलसंधारण हे पर्यावरणीय संतुलनासाठी अत्यावश्यक उपाय आहेत.

**पाणी अडवा, पाणी जिरवा : प्रभावी उपाय**

पावसाचे पाणी जमिनीत मुरवणे ही जलसंधारणाची सर्वात प्रभावी पद्धत आहे. यामुळे भूजल पातळी वाढते, विहिरी जिवंत राहतात आणि शेतीसाठी पाणी उपलब्ध होते.

शहरी भागातही रेनवॉटर हार्वेस्टिंग अनिवार्य करणे आवश्यक आहे. शासनाने नव्या बांधकामांसाठी ही अट बंधनकारक केली आहे, ही सकारात्मक बाब आहे.

भारतातील प्रयत्न : धोरण आणि अंमलबजावणी

भारत सरकारने पाणी व्यवस्थापनासाठी विविध योजना राबवल्या आहेत

जल जीवन मिशन प्रत्येक जल जीवन मिशन, अटल भूजल योजना,जलशक्ती अभियान,स्वच्छ भारत मिशन,महाराष्ट्र ग्रामीण पाणी पुरवठा योजना,मुख्यमंत्री जलसंधारण योजना,नमामि गंगे योजना अशा कितीतरी योजनांमधून केंद्र व राज्य शासन जनतेला शुद्ध पेयजल उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करत आहे.

प्रत्येक नागरिकाची भूमिका

शासन स्तरावर विविध योजना राबविण्यात येत असल्या तरी सामान्य नागरिकांनीही या मोहिमेत एक जबाबदार नागरिक म्हणून पुढे येणे गरजेचे आहे. पाणी वाचवण्याची सुरुवात शासनाकडून नव्हे, तर घरापासून होते. आपण काही सोपे उपाय अवलंबू शकतो.जसे की,नळ आणि पाईप गळती त्वरित दुरुस्त करणे,रेनवॉटर हार्वेस्टिंग करणे, सांडपाण्याचा पुनर्वापर, ठिबक सिंचनाचा वापर पाण्याचा अपव्यय टाळणे, वृक्षारोपण करणे, घरातील पाणी व्यवस्थापनात महिलांचा निर्णयाधिकार मान्य करणे,पाणी हा केवळ नैसर्गिक संसाधन नसून तो मानवी हक्क, सामाजिक न्याय आणि लिंगसमतेचा आधार आहे. जलसंकटाचा विचार करताना समतेचा दृष्टिकोन आवश्यक आहे. तसा विचार रुजवणे. यासोबतच घराघरात केवळ पाण्याच्या उपलब्धतेसाठी महिलांचे शोषण होणार नाही याची काळजी घेण्याचाही आजचा दिवस आहे. चला !तर महिलांच्या डोक्यावरचा हंडा काढूया आणि जल जीवन मिशन, अटल भूजल योजना, जलशक्ती अभियान, स्वच्छ भारत मिशन, महाराष्ट्र ग्रामीण पाणी पुरवठा योजना, विविध जलसंधारण योजनेच्या माध्यमातून पाणी टंचाई मुक्त समाज निर्मितीसाठी पुढे येऊया..

कारण पाणी वाचवणे म्हणजेच समाजाचे भविष्य सुरक्षित करणे होय.

**प्रवीण टाके**
**उपसंचालक (माहिती)**
**विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर**
**९७०२८५८७७७**

## दिसायला नको

असायला हवे,
जगणे गुणवत्तेचे
मिश्रण, व्हायला हवे.
दाखवायला नको,
करायला हवे,
प्रेम जगण्यातले,
वाढायला हवे.
वाचायला नको,
अनुभवायला हवे,
संघर्ष जगण्यातील,
स्वीकारायला हवे.
बोलणे नको,
कार्य व्हायला हवे,
जगणे कृतीमय
व्हायला हवे.
स्वप्न नको,
वास्तव हवे,
यश कल्पनेतले,
सत्यात उतरायला हवे.

**-प्रा. अमित शिंदे**
नांदेड.
मो. ९७६७८५१०४६

# पदवी म्हणजे केवळ कागद नव्हे, तर सन्मानाने जगण्याचा परवाना -डॉ. हरिश्चंद्र वंगे

## भोकर येथील दिगंबरराव बिंदू महाविद्यालयात २८ वा पदवी वितरण समारंभ उत्साहात संपन्न

**भोकर (प्रतिनिधी)–** पदवी ही केवळ शिक्षण पूर्ण केल्याची पावती नसून, खऱ्या अर्थाने ती जीवन जगण्यासाठीचा 'परवाना' (लायसन्स) आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने आपण आयुष्य का जगत आहोत, याची जाणीव ठेवली पाहिजे. शिक्षणातून काम करण्याची जिद्द निर्माण झाली पाहिजे, कारण रिकामे राहणे हे आयुष्यासाठी सर्वात मोठे संकट आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध विचारवंत डॉ. हरिश्चंद्र वंगे यांनी केले.

स्थानिक दिगंबरराव बिंदू महाविद्यालयाच्या २८ व्या पदवी वितरण समारंभात ते मुख्य अतिथी म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष तथा माजी मंत्री डॉ. माधवराव पाटील किन्हाळकर होते.



विद्यार्थ्यांनी नोकरीच्या मानसिकतेतून बाहेर पडावे

आपल्या भाषणात डॉ. वंगे यांनी आजच्या शिक्षण पद्धतीतील विसंगतीवर बोट ठेवले. ते म्हणाले की, आज विद्यार्थ्याला जे आवडते ते मिळत नाही आणि जे मिळते ते त्याला मनापासून जमतेच असे नाही. अशा कात्रीत आजचा युवक अडकला आहे. विशेषतः खेड्यातील मुलांमध्ये गुणवत्ता ठासून भरलेली आहे, फक्त त्यांना योग्य दिशेची गरज आहे. शिक्षण म्हणजे केवळ नोकरी मिळवण्याचे साधन नसून जीवन सुखकर करण्याचा मार्ग आहे. पदवी मिळाल्यानंतर खऱ्या अर्थाने जीवनाची सुरुवात होते.

मागील वर्षात उत्तीर्ण झालेल्या एकूण १८० विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पदवी प्रदान करण्यात आली. परीक्षा प्रमुख डॉ. माधव फेगडे यांनी पदवी प्राप्त विद्यार्थ्यांच्या वाटचालीवर शुभेच्छापर मनोगत व्यक्त केले.

### सृजनशीलता आणि चारित्र्य जपा –डॉ. किन्हाळकर

अध्यक्षीय समारोप करताना डॉ. माधवराव पाटील किन्हाळकर यांनी विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासावर भर दिला. ते म्हणाले, शिक्षणाचे खरे उद्दिष्ट केवळ माहिती मिळवणे नसून चारित्र्य निर्माण करणे हे आहे. प्रत्येक माणसामध्ये स्वत्व असते आणि ते जपण्यासाठी धडपड केली पाहिजे. जोपर्यंत विद्यार्थी आपल्यातील उपजत सृजनशीलता विकसित करत नाही, तोपर्यंत पदवी शिक्षणाचे मुख्य ध्येय साध्य होणार नाही. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पंजाब चव्हाण यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले व महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा मांडला.

## मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने वाटप योजनेत अर्ज करण्यासाठी २७ मार्च अंतिम मुदत

**नांदेड (प्रतिनिधी)–** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने सन २०२५-२६ या वर्षासाठी अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील नोंदणीकृत स्वयंसहाय्यता बचत गटांना ९ ते १८ अश्वशक्ती क्षमतेचे मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने ९० टक्के अनुदानावर उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या योजनेअंतर्गत लाभ घेऊ इच्छिणाऱ्या बचत गटांनी आपले अर्ज सादर करण्यासाठी तसेच त्रुटींची पूर्तता करण्यासाठी २७ मार्च २०२६ ही अंतिम मुदत निश्चित करण्यात आली आहे.

ज्या बचत गटांनी योजनेसाठी अर्ज प्राप्त करून घेतले आहेत, परंतु अद्याप अर्ज भरून समाज कल्याण कार्यालयाकडे सादर केलेले नाहीत, तसेच ज्यांच्या अर्जांमध्ये त्रुटी आढळल्या आहेत, त्यांनी निश्चित मुदतीत आपले अर्ज सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, नांदेड कार्यालयात सादर करावेत. अपूर्ण अथवा त्रुटीयुक्त अर्जांची आवश्यक पूर्तता करून घेणे अनिवार्य आहे.

अर्जातील त्रुटींबाबत माहिती मिळवण्यासाठी संबंधितांनी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, नांदेड कार्यालयाशी संपर्क साधावा. निर्धारित मुदतीनंतर प्राप्त होणारे अर्ज किंवा त्रुटींचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी, असे आवाहन सहाय्यक आयुक्त शिवानंद मिनगिरे यांनी केले आहे.

# रेल्वेकडून १४० टन ब्रेकडाउन क्रेनची संपूर्ण सुरक्षा मॉक ड्रिल यशस्वी

**नांदेड (प्रतिनिधी) –**रेल्वे प्रशासनाने सुरक्षितता व आपत्ती व्यवस्थापनाबाबतची आपली दृढ बांधीलकी दर्शवत नुकतेच १४० टन ब्रेकडाउन क्रेनची पूर्ण क्षमतेची लोड टेस्टिंग व सुरक्षा मॉक ड्रिल यशस्वीरीत्या आयोजित केली.



१४० टन ब्रेकडाउन क्रेन ही भारतीय रेल्वेच्या आपत्ती व्यवस्थापनातील अत्यंत महत्त्वाची यंत्रणा असून, रेल्वे अपघात, रुळावरून घसरणे (डिरेलमेंट), टक्कर किंवा इतर अनपेक्षित घटनांच्या वेळी ती महत्त्वाची भूमिका बजावते. उच्च उचल क्षमता, हायड्रॉलिक अचूकता आणि जलद हालचालीची क्षमता यामुळे ही क्रेन अपघातस्थळी अडकलेले डबे व इंजिन रुळावर आणणे, अडथळे दूर करणे आणि रेल्वे वाहतूक सुरक्षित व जलदगतीने पूर्ववत करण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरते.

या मॉक ड्रिल दरम्यान क्रेनच्या लिफ्टिंग मेकॅनिझम, ब्रेकिंग सिस्टम, आउटरीगर्स, सिंक्रोनायझेशन प्रणाली तसेच कार्यप्रणालीतील समन्वय यांची सखोल तपासणी करण्यात आली. या सरावामध्ये यांत्रिक, ऑपरेटिंग आणि सुरक्षा विभागांमधील समन्वय देखील प्रभावीपणे तपासण्यात आला, ज्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत सर्व पथके तत्परतेने कार्य करण्यास सज्ज राहतील याची खात्री करण्यात आली.

ही मॉक ड्रिल निर्धारित सुरक्षा मानकांचे काटेकोर पालन करून पार पाडण्यात आली, ज्यामुळे क्रेन तसेच ती चालवणाऱ्या कर्मचाऱ्यांची सतत उच्च स्तरावरील कार्यतत्परता सुनिश्चित होते.

अशा प्रकारच्या नियमित सुरक्षा सरावांमुळे रेल्वे कर्मचाऱ्यांची आपत्ती व्यवस्थापनाची तयारी अधिक बळकट होते. विभागांमधील समन्वय वाढतो आणि अपघाताच्या प्रसंगी रेल्वे सेवा जलदगतीने पूर्ववत करण्यास मदत होते. यामुळे प्रवासी सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्याच्या रेल्वेच्या कटिबद्धतेची पुन्हा एकदा प्रचिती येते.

## पर्यावरण शिक्षणांतर्गत चौफाळा येथे वनविभागाची हरित सेना शाळा संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)–** सामाजिक वनीकरणाच्या वतीने पर्यावरण शिक्षणांतर्गत हरित सेना शाळेचे आयोजन शहराच्या चौफाळा येथील जिल्हा परिषद शाळेत करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांना पर्यावरणाचे रक्षण कसे करावे याबद्दल माहिती देण्यात आली.

शुक्रवार, दिनांक २० मार्च रोजी सामाजिक वनीकरणाचे विभागीय वन अधिकारी संदीप चव्हाण व सहायक वनसंरक्षक श्रीकांत जाधव, गिरीश लखेकर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरण शिक्षण कार्यक्रमांतर्गत हरित सेना शाळा जिल्हा परिषद हायस्कूल चौफाळा नांदेड व श्री शिवाजी हायस्कूल माध्यमिक विद्यालय पावडेवाडी नांदेड येथे जागतिक चिमणी दिनाबद्दल विद्यार्थ्यांना पर्यावरणामध्ये चिमण्यांचे महत्त्व सांगून चिमण्यांसाठी शाळेतील झाडांवर पाणपोई बांधून त्यात उन्हाळ्यात दररोज चिमण्यांसाठी पाणी टाकण्याबद्दल आवाहन करून मुलांमध्ये जनजागृती करण्यात आली. त्यानंतर श्री शिवाजी माध्यमिक विद्यालय पावडेवाडी येथे जागतिक वन दिनानिमित्त वृक्ष लागवड करून जागतिक वन दिन साजरा करण्यात आला.

वनपरिक्षेत्र अधिकारी गिरीश लखेकर पाटील यांनी २२ मार्च रोजी जागतिक जलदिनाबद्दल विद्यार्थ्यांना पाण्याचे महत्व समजावून सांगून पाण्याचा वापर काटकसरीने करावा याबद्दल विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यात आली.

## राज्य शासनाच्या उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार प्रवेशिका पाठविण्याकरिता मुदतवाढ

**नांदेड (प्रतिनिधी)–** माहिती व जनसंपर्क महासंचाल-नालयामार्फत उत्कृष्ट पत्रकारिता, उत्कृष्ट लेखन, उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा, उत्कृष्ट छायाचित्रकार, समाज माध्यम आणि स्वच्छता अभियानाबाबत केलेल्या जनजागृतीपर लेखनासाठी पुरस्कार स्पर्धा जाहीर करण्यात येत आहे.

या स्पर्धेसाठी दि. १ जानेवारी २०२५ ते ३१ डिसेंबर, २०२५ पर्यंतच्या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या लेखन/छायाचित्रे/वृत्तकथा यांच्या प्रवेशिका मागविण्यात येत आहेत. प्रवेशिका मागविण्याचा अंतिम दिनांक १५ मार्च, २०२६ असा होता. सदर पुरस्कारांसाठी प्रवेशिका मागविण्याकरीता दि. ३१ मार्च, २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

# उमरीमध्ये प्रथमच पाळला गेला छत्रपती संभाजी महाराज बलिदानमास

**उमरी (प्रतिनिधी)–** उमरी येथे पहिल्यांदाच छत्रपती संभाजी महाराज बलिदानमास पाळण्यात आला. यानिमित्त भाविक-भक्तांनी उत्स्फुर्त सहभाग दर्शविला.

छत्रपती संभाजी महाराजांचा बलिदान दिन फाल्गुन महिन्याच्या पहिल्या दिवसापासून अमावास्येपर्यंत सुमारे एक महिना बलिदान मास म्हणून पाळण्यात येतो. हा काळ फक्त इतिहास आठवण्याचा नाही, तर स्वतःला विचारण्याचा आहे. आपण आपल्या तत्वांसाठी किती ठाम आहोत? छत्रपती संभाजी महाराजांनी एका महिन्यापेक्षा अधिक काळ अत्यंत कठीण छळ सहन केला, पण आपल्या श्रद्धा, स्वाभिमान आणि तत्वांशी तडजोड केली नाही. परिस्थिती कितीही कठीण असली तरी



झुकायचे नाही हा त्यांचा खरा संदेश आहे. यासाठी १८ फेब्रुवारी २०२६ रोजी नगरसेविका सायली संजय कुलकर्णी आणि साईप्रसाद सुभाष पेरेवार यांनी महादेव मंदिर उमरी येथे छत्रपती संभाजी महाराज बलिदानमास आवाहन सभा बोलवली होती.

यावेळी सर्वांनी मिळून छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन केले. तसेच माजी नगराध्यक्ष संजय कुलकर्णी आणि माजी नगराध्यक्ष सुभाष पेरेवार यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या बलिदानमासानिमित्त प्रत्येकाने आपल्या आवडीची एखादी गोष्ट, सवय किंवा सुखसोयीपैकी काहीतरी एक महिन्यासाठी स्वेच्छेने सोडण्याचा संकल्प केला आणि तशी प्रतिज्ञा केली.

महिनाभर संकल्प पाळल्या-नंतर फाल्गुन अमावस्या म्हणजेच दि. १८ मार्च २०२६ रोजी पुन्हा एकत्र जमून छत्रपती संभाजी महाराजांचे स्मरण करून त्यांच्या धैर्य आणि स्वाभिमानाचे प्रतीक म्हणून दिव्यांची आरस केली आणि छत्रपती संभाजी महाराजांचा जयघोष करून वर्षभर छत्रपती संभाजी महाराजांच्या त्यागाची जाणीव मनात ठेऊन धर्मासाठी काहीतरी करण्याच्या संकल्प करत बलिदान मासाची सांगता केली. यावेळी अनेक हिंदू बांधव भगिनी उपस्थित होते.

## पीपल्स हायस्कूल येथे भगवद्गीता पाठांतर स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार



**नांदेड (प्रतिनिधी) –**येथील नांदेड एज्युकेशन सोसायटी संचलित पीपल्स हायस्कूल येथे चिन्मय मिशनतर्फे घेण्यात आलेल्या भगवद्गीता पाठांतर स्पर्धेत पीपल्स हायस्कूल येथील अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. सहभागी विद्यार्थ्यांपैकी आयुष मामीडवार या विद्यार्थ्यांचे विभागीय पातळीसाठी निवड झाली आहे. या विद्यार्थ्यासह प्रत्येक गटातील यशस्वी विद्यार्थ्यांना चिन्मय मिशनतर्फे पारितोषिक देऊन सत्कार सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक प्रशांत चौधरी, स्वामी प्रत्यानंद, विमलताई, सुचिताताई, कोडगिरे, योजना बच्चेवार, अरविंद काळे, व्ही. आर. चिलवरवार, शिवराज कदम मनोहर राठोड,मनीषा वानेगावकर, श्रद्धा सावले, पुल्लावार, अनिता गुंडेवार, दीपिका यादव, मोकाटे मामा, सचिन शिरडकर, गहलोत यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शहरात घरफोडी करणारे अट्टल चोरटे अटकेत; सव्वादोन लाखांचे दागिने जप्त

**नांदेड (प्रतिनिधी) –**शहर आणि परिसरात घरफोडी करून सोन्या-चांदीचे दागिने लंपास करणाऱ्या टोळीला अखेर स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी जेरबंद केले. पकडलेल्या चोरट्यांकडून सव्वादोन लाख रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने जप्त करण्यात आले आहेत.

पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांनी आपले सहकारी पोलीस उपनिरीक्षक मिलिंद सोनकांबळे व त्यांच्या पथकातील अंमलदार यांना जिल्ह्यातील चोरीच्या माला विरुद्धचे गुन्हे उघडकीस आणण्याबाबत आदेशीत केल्याने मिलिंद सोनकांबळे व त्यांचे पथकातील अंमलदार हे दि. २०



मार्च रोजी आरोपी शोधकामी पथकासह रवाना झाले.

शहरातील चैतन्यनगर येथे आले असता त्यांना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, आसना ब्रिजचे खाली दोन युवक हे घरफोडी केलेले सोन्या-चांदीचे दागिने विक्री करण्याकरिता थांबलेले आहेत. या माहितीवरुन सदर पथकाने घटनास्थळी जाऊन छापा टाकला असता अब्दुल उस्मान अब्दुल समी (वय २६ वर्ष रा. खुदबेनगर, नांदेड) आणि शेख मोबीन शेख गोस (वय २५ वर्षे रा. खुदबेनगर चौरस्ता मलंगबाबा बिल्डींग नांदेड) हे मिळून आले. या दोघांची संशयावरुन पंचासमक्ष अंगझडती घेतली असता त्याचे ताब्यात अर्धापूर हद्दीतील एक सोन्याचा नेकलेस, कानातील झुमके व नांदेड ग्रामीण हद्दीतील चांदीच्या ६ बांगड्या असा चोरलेला एकूण २ लाख २५ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. आरोपींनी वरील गुन्हे केल्याची कबुली दिल्याने सदरचा मुद्देमाल जप्त करून मुद्देमालासह आरोपींना पोलीस स्टेशन अर्धापूर, नांदेड येथे पुढील कायदेशीर कारवाई कामी ताब्यात देण्यात आले आहे.

# डॉ. हेडगेवार नामफलकाचे पुष्पहार अर्पण करून पूजन



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** सिडको येथील छत्रपती शिवाजी महाराज स्मारक येथे १९ मार्च रोजी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वतीने गुढीपाडवा व वर्षप्रतिपदा उत्सव साजरा करण्यात आला. त्यानंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे आद्य सरसंघचालक डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांच्या जन्मदिनानिमित्त, सिडको येथील हेडगेवार चौक येथे नामफलकाचे पुष्पहार अर्पण करून पूजन केले.

सिडको मुख्य रोडवर असलेल्या धनुष्यबाण कमानी जवळ नामफलकाचे पुजन करण्यात आले. यावेळी समीर पाटील, राजीव मिरजकर, श्रीनिवास अमिलकंठवार, गजानन गोरे, प्रभाकर डहाळे, सुनील खोडवे,मुकुंद पेकमवार, अक्षय लोखंडे, किशोर चौधरी, गंगाधर मैलारे, अभिषेक देशमुख, तेजस माळवे व तुकाराम बेस्ते आदी उपस्थित होते.

# गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर 'लोकनेते गोपीनाथराव मुंडे पाणपोई' सुरू

**नांदेड (प्रतिनिधी)–** गुढीपाडव्याच्या पावन मुहूर्तावर समाजसेवेची परंपरा जपत अ‍ॅड. दिलीप ठाकूर यांच्या वतीने 'लोकनेते गोपीनाथराव मुंडे पाणपोई' उपक्रम सतत २५ व्या वर्षीही सुरू करण्यात आला. गुरुवारी भाजपा महानगराध्यक्ष, माजी आमदार अमर राजूरकर यांच्या हस्ते या पाणपोईचे उद्‌घाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी किसान मोर्चाचे राम अय्यर होते, तर भाजपा उपाध्यक्ष बागड्या यादव यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी अध्यक्षीय समारोप करताना राम अय्यर म्हणाले की, निष्ठावान कार्यकर्ते असूनही स्वीकृत सदस्य पद न मिळाल्यानंतरही अ‍ॅड. दिलीप ठाकूर यांनी नाराजी न दाखवता सेवा कार्य सुरू ठेवले. आजच्या राजकारणात अशी वृत्ती दुर्मिळ असून, त्यांच्या कार्यातून वेगळेपण स्पष्ट दिसून येते.



गेल्या दोन दशकांहून अधिक काळापासून वाघी-नाळेश्वर सर्कल परिसरातील १६ गावांतील प्रवासी तसेच मिलरोड वसाहतीतील नागरिकांसाठी उन्हाळ्यात शीतपाणी उपलब्ध करून देण्याचा हा उपक्रम सातत्याने राबविला जात आहे. कोणत्याही पदाची अपेक्षा न ठेवता समाजसेवेचा वसा जपणाऱ्या अ‍ॅड. ठाकूर यांच्या या कार्याची परिसरात विशेष दखल घेतली जात आहे.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला लोकनेते कै. गोपीनाथ मुंडे, कै. गोपालसिंह ठाकूर, मातोश्री कै. वनमाला ठाकूर, कै. अ‍ॅड. श्याम जाधव, कै. बिरजू यादव, कै. लक्ष्मीबाई भुसेवाड यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. प्रास्ताविकात अ‍ॅड. दिलीप ठाकूर यांनी या उपक्रमामागील सेवा भावना आणि सातत्याची भूमिका स्पष्ट केली.

यावेळी मार्गदर्शन करताना अमर राजूरकर म्हणाले की, उन्हाळ्यात तहानलेल्या व्यक्तीस थंड पाणी देणे हीच खरी लोकसेवा आहे. अशा उपक्रमांची गरज आज अधिक आहे. तसेच राजेश यादव यांनी अ‍ॅड. ठाकूर यांच्या विविध सामाजिक उपक्रमांचा उल्लेख करत अन्नदान, चप्पल वाटप, छत्री वितरण, ब्लँकेट सेवा व 'कायापालट' अभियानासारख्या कार्यांची माहिती दिली.

## कृषी अवजारांसाठी मिळणार २४ लाखांपर्यंतचे अनुदान

**नांदेड (प्रतिनिधी)–** नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या (पोकरा) दुसऱ्या टप्प्यांतर्गत जिल्ह्यातील शेतकरी उत्पादक कंपन्या आणि महिला बचत गटांना कृषी व्यवसायात भरारी घेण्यासाठी अर्थसहाय्य उपलब्ध होणार आहे. या योजनेंतर्गत गावपातळीवर 'कृषी अवजार बँक' स्थापन करण्यासाठी प्रकल्प मूल्यांच्या ६० टक्के म्हणजेच कमाल २४ लाख रुपयांपर्यंत अनुदान दिले जाणार आहे.

या उपक्रमासाठी प्रकल्प गावातील उमेद आणि माविम यांच्याद्वारे पुरस्कृत महिला बचतगट तसेच गाव संघ पात्र राहतील, अशी माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयामार्फत देण्यात आली आहे.

# विविध कृषी पुरस्कारांसाठी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्य शासनातर्फे दरवर्षी कृषी क्षेत्रात संघटनात्मक कार्य करणाऱ्या व्यक्ती, गट/संस्थेला पुरस्कार देण्यात येतो. त्या अनुषंगाने विविध कृषी पुरस्कारांसाठी इच्छुकांना ऑनलाईन अर्ज करण्याचे आयोजन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्य हे कृषी उत्पादन व कृषी उद्योग क्षेत्रात अग्रेसर राज्य म्हणून ओळखले जाते. राज्य शासनातर्फे दरवर्षी कृषी क्षेत्रात संघटनात्मक कार्य करणाऱ्या व्यक्ती, गट/संस्थेला पुरस्कार देण्यात येतो. उल्लेखनीय, अतिउल्लेखनीय कार्य करणारे तसेच राज्य, जिल्ह्याला दिशादर्शक ठरणारे शेतकरी, व्यक्ती, संस्था, गटांना पुरस्कार प्रदान करण्यात येतो. राज्यात दरवर्षी शेती, फलोत्पादन व पुरकक्षेत्रात अतिउल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिला शेतकरी तसेच पुरुष शेतकरी अथवा संस्थेस कृषी विभागामार्फत डॉ. पंजाबराव देशमुख कृषीरत्न पुरस्कार, वसंतराव नाईक कृषीभूषण पुरस्कार, जिजामाता कृषीभुषण पुरस्कार, कृषीभूषण (सेंद्रिय शेती) पुरस्कार, वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार, उद्यानपंडित पुरस्कार, युवा शेतकरी पुरस्कार व वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार इत्यादी पुरस्कार राज्यपाल महोदय महाराष्ट्र राज्य यांचे हस्ते प्रदान करुन सन्मानित करण्यात येते.

यापूर्वी विविध कृषी पुरस्कारांचे प्रस्ताव चार प्रतींमध्ये ऑफलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येत होते. प्रस्ताव बनविण्यासाठी खर्च येत असल्याने सर्व इच्छुक शेतकरी अर्ज करू शकत नव्हते. या पारंपरिक पद्धतीमुळे प्रस्ताव सादरीकरण, पडताळणी व संकलनासाठी अधिक कालावधी लागत होता. या पार्श्वभूमीवर पुरस्कार प्रस्तावांची प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक व प्रभावी करण्याच्या दृष्टीने कृषी विभागामार्फत पुरस्कार प्रस्ताव ऑनलाईन स्वरूपात स्वीकारण्यासाठी स्वतंत्र संगणकीय प्रणाली विकसित करण्यात आली आहे. सदर प्रणाली कृषी विभागाच्या संकेतस्थळावर (https://krishi.maharashtra.gov.in) कृषी पुरस्कार टॅबमध्ये उपलब्ध आहे.

सदर संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून पुरस्कार प्रस्ताव सादरीकरण, तपासणी, मूल्यांकन तसेच अहवाल निर्मिती ही संपूर्ण प्रक्रिया डिजिटल स्वरूपात राबविणे शक्य होणार आहे. यामुळे मानवी हस्तक्षेप कमी होऊन पारदर्शकता वाढणार असून, पुरस्कार प्रक्रियेची कार्यक्षमता, विश्वासार्हता व परिणामकारकता अधिक बळकट होणार आहे. तसेच शेतकऱ्यांनी खालीलप्रमाणे विहित कालावधीत अर्ज करावा.

शेतकऱ्यांना पुरस्कारासाठी आवश्यक असलेला जिल्हा पोलीस अधीक्षक यांचेकडील चारित्र्य पडताळणी दाखला प्राप्त करून घेण्यास १५-२० दिवसांचा कालावधी आवश्यक आहे, त्याबरोबर Network issue, तांत्रिक अडचण यांमुळे शेतकऱ्यांना विहित मुदतीत अर्ज सादर करण्यास अडचण येत आहे. तसेच मार्च महिन्यात आर्थिक वर्षाच्या अनुषंगाने कामकाज असल्यामुळे क्षेत्रीय यंत्रणांना प्रत्यक्ष पडताळणीसाठी देखील कालावधी आवश्यक आहे. यामुळे शेतकरी स्तरावरून व क्षेत्रीय स्तरावरून दूरध्वनीद्वारे सदरची मुदत वाढवून मिळणेबाबत होत असलेल्या विनंतीच्या अनुषंगाने केवळ सन २०२५ करिता विविध कृषी पुरस्कार सादर करणेसाठी सुधारित नियोजन पुढीलप्रमाणे राहील.

अर्जदाराने ऑनलाईन अर्ज भरणे. सहाय्यक कृषी अधिकारी यांनी अर्जदाराचा ऑनलाईन अर्जाची छाननी करून, समक्ष भेट देऊन अनुषंगिक बाबींची पूर्ततेची कार्यवाही करून तालुका कृषी अधिकारी यांचेकडे अर्ज सादर करणे. तालुका कृषी अधिकारी यांनी अर्जदाराचा ऑनलाईन अर्ज छाननी, समक्ष भेट, सहाय्यक कृषी अधिकारी यांचे अभिप्राय यांची प्रत्यक्ष पडताळणी करून जिल्हास्तर समितीकडे अर्ज सादर करण्याचा सुधारित कालावधी ३१ मार्च २०२६ अखेर राहील.

जिल्हास्तर समितीने प्राप्त प्रस्तावांची छाननी करून, समक्ष भेट देऊन उल्लेखनीय कार्याबाबतच्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह शिफारशीसह अर्ज विभागस्तरीय समितीकडे सादर करण्याचा कालावधी १० एप्रिल २०२६ अखेर असल्याचे कळविले.

# चंदेरी

## विशेष मुलाखतीत दिव्या दत्ताचे परखड मत

# लग्नावर चर्चा मी का करू, हे माझं आयुष्य, त्याबद्दल मी ठरवेन...

**आज दिव्या दत्ताला कोणत्याही परिचयाची गरज नाही. ती पंजाबी चित्रपट, बॉलीवूड आणि आता ओटीटीच्या जगात आपली छाप सोडत आहे. १९९४ मध्ये अभिनयात पदार्पण केल्यापासून दिव्या दत्ताने तिच्या ३२ वर्षांच्या कारकिर्दीत विविध प्रकारच्या भूमिका साकारून स्वतःची ओळख निर्माण केली आहे. २०१७ च्या 'इरादा' या चित्रपटासाठी राष्ट्रीय पुरस्कार जिंकल्यानंतर दिव्या दत्ता सध्या ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित झालेल्या तिच्या 'चिरैया' या नवीन मालिकेमुळे चर्चेत आहे. मॅरिटल रेपसारख्या संवेदनशील विषयावर भाष्य करणाऱ्या 'चिरैया' मालिकेशिवाय दिव्याने विवाह संस्था, महिला सक्षमीकरण, महिलांमधील असुरक्षितता, स्वतःचे लग्न आणि पुरुषप्रधान विचारसरणी यावर विशेष मुलाखतीत चर्चा केली.**



» **तुमच्या मालिकेत मोठी जाऊ छोट्या जाऊच्या पाठिशी उभी राहते, ते पाहणे खूप हृदयस्पर्शी आहे. महिलांनी एकमेकींना सक्षम करणे आणि पाठिंबा देणे हे तुम्हाला किती महत्त्वाचे वाटते?**

» **दिव्या :** हे खूप महत्त्वाचे आहे. कारण आपल्या समाजातील अनेक महिला स्वतःसाठी आवाज उठवू शकत नाहीत. अशा परिस्थितीत जर कोणी आपला दृष्टिकोन बाजूला ठेवून तुमचं ऐकून घेतलं आणि आधार दिला, तर ती आपल्या समाजासाठी एक सुंदर गोष्ट असेल. मालिकेत एक स्त्री दुसऱ्या स्त्रीच्या पाठीशी उभी राहिली आणि तेही अशा नात्यात जे रक्ताचे नाही. त्या माय-लेकी नाहीत, तर जावा-जावा आहेत. ज्यांच्यात स्पर्धा आणि असुरक्षिततेची भावना नेहमीच असते, त्यामुळे ही खूप सुंदर गोष्ट आहे.

» **तुझ्या वैयक्तिक आयुष्यात पितृसत्ताक विचारसरणी होती का, ज्यामुळे तुला त्याविरुद्ध बंड करण्याची इच्छा झाली? की तू ती मोडून काढली?**

» **दिव्या :** माझी आई एकटीच माझा सांभाळ करणारी होती. मी खूप लहान वयातच माझ्या वडिलांना गमावलं. तिने मला एकटीने वाढवलं आणि आम्हाला आमचे निर्णय स्वतः घेण्याचं स्वातंत्र्य दिलं. तिने मला सांगितलं की तिला डॉक्टर व्हायला सांगितलं होतं, म्हणून ती डॉक्टर झाली. ती एक विपुल लेखिका होती आणि नंतरसुद्धा तिने लिखाण सुरू ठेवलं. पण तिला ते निवडण्याचं स्वातंत्र्य नव्हतं. म्हणून तिने मला सांगितलं, 'जर तुला अभिनेत्री व्हायचं असेल, तर हो.' उद्या तुम्ही असं म्हटलेलं मला ऐकायचं नाही की, मला हे करायचं होतं, पण माझ्या आईने मला करू दिलं नाही. मला ते स्वातंत्र्य मिळालं होतं आणि मी त्याच विचाराने मोठी झाले. म्हणून, जर कोणी मला काही करण्यापासून थांबवलं तर मला ते आवडत नाही. जेव्हा मला वाटतं की मी बोलायला हवं, तेव्हा मी बोलते.

» **'चिरैया' हा चित्रपट वैवाहिक बलात्काराच्या संवेदनशील विषयावर आधारित आहे. यावर तुझं वैयक्तिक मत काय आहे?**

» **दिव्या :** ही मुळात एका अशा स्त्रीची कथा आहे जिचं आयुष्य सुरळीत चाललेलं असतं. पण, जे तिला योग्य आणि सामान्य वाटतं, ते खरंतर तसं नसतं. योग्य आणि अयोग्य हे कोण ठरवतं? आपल्या देशातील अनेक लोकांना योग्य-अयोग्य काय हे माहीतच नसतं. एक ठरलेली दिनचर्या सुरूच राहते. जरी आम्ही एखादं आंदोलन सुरू करत नसलो, तरी ही कथा इतकी आपल्याशी मिळतीजुळती आहे की, आपल्याला याबद्दल जागरूकता निर्माण करण्याची गरज आहे असं



वाटेल. कारण असं घडतंय हे अनेक लोकांना माहीतसुद्धा नसतं.

» **विवाह संस्थेबद्दल तुझं मत काय आहे? तू लग्नाच्या गरजेची कल्पना मोडून काढली आहे!**


» **दिव्या :** हा एवढा मोठा मुद्दा का बनवला जातो हे मला समजत नाही. प्रत्येकजण मला लग्नाबद्दल विचारतो. मला वाटतं की मला उत्तर देण्याची गरज नाही. ती संकल्पना मोडण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. हे माझं आयुष्य आहे. मला जे वाटेल ते मी करेन. त्यावर चर्चा करणे किंवा त्याचे समर्थन करणे आवश्यक आहे असे मला वाटत नाही. इतरांच्या मतांबद्दल बोलायचं झालं तर, प्रत्येकाचा स्वतःचा दृष्टिकोन असतो. बऱ्याच लोकांना लग्न करायचं असतं, तर बऱ्याच जणांना नसतं. दोन्हीपैकी कोणीही चुकीचं नाही. दोघांचेही स्वतःचे दृष्टिकोन आहेत आणि आपण दोघांचाही आदर केला पाहिजे.



## अमित बहल एक्सक्लुझिव्ह

# कलाकारातील जिज्ञासूपणामुळेच सर्जनशीलता जीवंत

**लोकप्रिय अभिनेता अमित बहल सध्या त्यांच्या 'जय हिंद जय सिंध' या नवीन चित्रपटामुळे चर्चेत आहे. चित्रपटाच्या नुकत्याच झालेल्या पोस्टर लाँचप्रसंगी त्यांच्याशी चित्रपटातील त्यांच्या भूमिकेबद्दल, खलनायकाची भूमिका साकारण्यातील आव्हानांबद्दल आणि तरुण कलाकारांसमोरील आव्हानांविषयी संवाद साधला...**



छोट्या पडद्यापासून ते चित्रपट आणि वेब सिरीजपर्यंत, ३ दशकांहून अधिक दीर्घकाळ करिअरमध्ये आपली वेगळी ओळख निर्माण करणारे अमित बहल आजही स्वतःला विद्यार्थीच मानतात. १५० हून अधिक टीव्ही शो आणि सुमारे ३० वेब सिरीजमध्ये काम केलेल्या अमित बहल यांचा असा विश्वास आहे की, कलाकाराच्या मनातील विद्यार्थ्याला जिवंत ठेवणे हीच खरी त्यांची ताकद आहे.

स्वतःला विद्यार्थी मानणारे अमित बहल याचे कारण सांगतात. ते म्हणाले, की सर्जनशीलता, मग ती अभिनय असो, लेखन असो, दिग्दर्शन असो किंवा चित्रकला असो, ती तोपर्यंतच जिवंत राहते, जोपर्यंत कलाकाराच्या मनातील बालक जिवंत असतो. ज्या दिवशी कलाकाराच्या मनातील जिज्ञासू बालक संपेल, त्याच दिवशी त्याची सर्जनशीलता संपेल. बहल हे प्रत्येक नवीन कामातून काहीतरी अधिक चांगले करण्याचा प्रयत्न करत असतात.



» **अजूनही नवीन गोष्टी शोधण्याची ओढ :** टीव्ही, चित्रपट आणि वेब या तिन्ही माध्यमांमध्ये सक्रिय असलेले अमित बहल म्हणतात की, त्यांनी जवळपास ३२ वर्षे सातत्याने काम केले आहे, पण त्यांना दररोज काहीतरी नवीन सापडत असल्यासारखे वाटते. ते म्हणाले, की दररोज एक नवीन दिग्दर्शक आणि एक नवीन लेखक येतो आणि आम्हाला त्यांच्या शैलीशी जुळवून घ्यावे लागते. तंत्रज्ञान बदलत आहे, कथा विकसित होत आहेत आणि प्रेक्षकांच्या आवडीनिवडी बदलत आहेत. अशा परिस्थितीत, कलाकारांनी स्वतःला सतत अधिक सक्षम बनवणे महत्त्वाचे आहे. त्यांचा विश्वास आहे की, जर सराव केला नाही, तर 'यंत्राला गंज चढेल.' म्हणूनच ते आपल्या मुळांशी जोडलेले राहतात आणि वेळोवेळी रंगभूमीवर काम करत राहतात.

» **खलनायकाची भूमिका साकारणे सोपे नाही... :** अमित बहल यांनी अनेक नकारात्मक भूमिकाही साकारल्या आहेत. ते कबूल करतात, की खलनायकाची भूमिका साकारणे सोपे नाही, कारण त्यासाठी प्रचंड दृढनिश्चयाची गरज असते. ते म्हणाले, की नायकापेक्षा खलनायक आपल्या विश्वासांमध्ये अधिक रमलेला असतो आणि कदाचित म्हणूनच नकारात्मक पात्रे प्रेक्षकांच्या अधिक लक्षात राहतात. विविध प्रोजेक्टमधील आपल्या विविध भूमिकांचा उल्लेख करत ते म्हणाले, की अभिनेत्याची शारीरिक ठेवण, आवाज आणि व्यक्तिमत्त्व यावर आधारित भूमिका दिल्या जातात, पण तुम्ही त्या किती प्रामाणिकपणे साकारता हे महत्त्वाचे आहे. माझ्या शरीरयष्टी आणि आवाजामुळे मला अमरीश पुरीजींसारख्या भूमिकांची ऑफर आली आहे.

» **जेन झेडवरील स्पर्धेचा दबाव :** अमित बहल स्पष्टपणे सांगतो की, प्रशिक्षण आणि शिकण्याची इच्छा असल्याशिवाय या इंडस्ट्रीत टिकून राहणे कठीण आहे. त्यांचा विश्वास आहे, आजच्या जनरेशन झेड कलाकारांना खूप स्पर्धेला सामोरे जावे लागते. प्रत्येक शुक्रवारी कोणाचे तरी भविष्य ठरते. त्यामुळे, त्यांना आणखी कठोर परिश्रम करावे लागतील. नवीन कलाकारांनी अभिनयाचे योग्य प्रशिक्षण घ्यावे, सातत्याने सराव करावा आणि स्वतःमध्ये सतत सुधारणा करत राहावे.

» **कडक वडिलांची भूमिका :** आपल्या आगामी 'जय हिंद जय सिंध' या चित्रपटाबद्दल बोलताना अमित बहल म्हणाला, की मी एका कडक वडिलांची भूमिका साकारत आहे. अनेक महाविद्यालये चालवणारे एक मोठे व्यावसायिक, ते आपल्या मुलाला काहीतरी करायला सांगतात. ही एक नकारात्मक भूमिका आहे, जी अखेरीस सकारात्मक ठरते.

# अर्जुन रामपालची 'छत्रपती शिवाजी महाराज' चित्रपटात एन्ट्री

**'कांतारा' या चित्रपटामुळे घराघरांत पोहोचलेला लोकप्रिय अभिनेता ऋषभ शेट्टी लवकरच एका बिग बजेट चित्रपटाच्या माध्यमातून रुपेरी पडद्यावर झळकणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांवरील एका चित्रपटातून तो प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. या चित्रपटात आता एका लोकप्रिय बॉलीवूड अभिनेत्याची एन्ट्री झाली आहे.**

ऋषभ शेट्टीच्या आगामी बहुचर्चित चित्रपटाचे नाव 'द प्राईड ऑफ भारतः छत्रपती शिवाजी महाराज असं आहे आणि यात अभिनेता ऋषभ स्वतः छत्रपती शिवाजी महाराजांची भूमिका साकारत आहे. अशातच आता यात 'धुरंधर'मधील एका अभिनेत्याची दमदार एन्ट्री झाल्याचे वृत्त समोर येत आहे. अभिनेता अर्जुन रामपाल ऋषभ शेट्टीच्या चित्रपटात दिसणार असून यात तो खलनायक साकारणार आहे. धुरंधर २ नंतर अर्जुन रामपाल इम्तियाज अली यांच्या 'ओ साथी रे' या नेटफ्लिक्सवरील रोमॅंटिक चित्रपटात दिसणार आहेत. याशिवाय त्याचे '३ मंकीज', 'पेंटहाउस', 'पंजाब ९५', 'ब्लाइंड गेम' आणि 'बॅटल ऑफ भीमा कोरेगाव' हे चित्रपटही लवकरच प्रदर्शित होणार आहेत. 'द प्राईड ऑफ भारतः छत्रपती शिवाजी महाराज' या चित्रपटाचे दिग्दर्शन संदीप सिंह करत असून हा त्यांचा दिग्दर्शक म्हणून पहिलाच चित्रपट आहे. या चित्रपटात छत्रपती शिवाजी महाराजांचे शौर्य, युद्धनीती आणि संघर्ष दाखवले जाणार आहेत. हा चित्रपट पुढच्या वर्षी म्हणजेच, २१ जानेवारी २०२७ रोजी हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. रितेश देशमुखदेखील छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित बिग बजेट चित्रपट घेऊन प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे,



ज्याचे नाव आहे 'राजा शिवाजी'. येत्या १ मे २०२६ पासून हा चित्रपट सर्वत्र प्रदर्शित होईल. यात जिनिलीया देशमुख, संजय दत्त, अभिषेक बच्चन, सचिन खेडेकर, महेश मांजरेकर, विद्या बालन अन् भाग्यश्रीसह अनेक कलाकार आहेत.

# 'धुरंधर 2' साठी रणवीर सिंहने घेतले 50 कोटी

'धुरंधर' हा २०२५ मधील ब्लॉकबस्टर चित्रपट ठरला. त्यातील सीन, संवाद, गाणी, डान्स स्टेप्स व पात्र सगळंच हिट ठरलं आणि सोशल मीडियावर क्रेझ निर्माण झाली. अशातच आता १९ मार्च रोजी या चित्रपटाचा दुसरा भाग थिएटरमध्ये प्रदर्शित झाला. ५ डिसेंबर २०२५ रोजी 'धुरंधर' प्रदर्शित झाल्यानंतर या चित्रपटाच्या शेवटी १९ मार्च २०२६ मध्ये सीक्वेल प्रदर्शित होणार, असं सांगण्यात आलं होतं. 'धुरंधर'ने जगभरात आणि देशातील बॉक्स ऑफिसवर कोट्यवधींचा व्यवसाय केला आणि अनेक हिट चित्रपटांचे रेकॉर्ड मोडले. अशातच आता दुसऱ्या भागाकडूनही तीच अपेक्षा ठेवली जात आहे. 'धुरंधर २'चं बजेट माध्यमांच्या वृत्तानुसार २७५ कोटी इतकं आहे. रणवीर सिंहने 'धुरंधर २'साठी ५० कोटी रुपये इतकं मानधन घेतलं असल्याचं म्हटलं आहे. तो या चित्रपटातील सर्वाधिक मानधन घेणारा अभिनेता आहे. त्यामध्ये तो हमजा आणि जसकीरत सिंह रंगी या भूमिकेत पाहायला मिळणार आहे. संजय दत्त यामध्ये पुन्हा अस्लम चौधरीच्या भूमिकेतून पाहायला मिळणार आहे. या चित्रपटासाठी त्याने १० कोटी रुपये मानधन घेतलं आहे. संजय दत्तची सीक्वेलमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका असणार आहे. अर्जुन रामपाल या चित्रपटात खलनायकाच्या भूमिकेतून झळणार आहे. पहिल्या भागात तो इलियास कश्मिरी या भूमिकेतून झळकलेला. आता सीक्वेलमधूनही पुन्हा तो या भूमिकेतून दिसणार आहे. धुरंधरमधून मुख्य नायिका म्हणून सारा अर्जुनने पदार्पण केलं. पहिल्या भागाच्या तुलनेत दुसऱ्या भागात तिची अधिक महत्त्वाची भूमिका असणार आहे, ज्यासाठी तिनं उल्लेख केलेल्या माध्यमाच्या वृत्तानुसार एक कोटी रुपये मानधन घेतलं आहे. आर. माधवन या चित्रपटात महत्त्वपूर्ण भूमिकेत आहे. त्याने यामध्ये अजय सन्याल ही भूमिका साकारली आहे. त्यानं या चित्रपटासाठी नऊ कोटी रुपयांचं मानधन घेतलं आहे. रणवीर सिंहनंतर किंबहुना प्रेक्षकांची त्याच्यापेक्षा मोठ्या प्रमाणात धुरंधरमधून प्रसिद्धी मिळवणारा अभिनेता म्हणजे अक्षय खन्ना. अक्षयने यामध्ये रहमान डकैत ही भूमिका साकारली आहे. त्यासाठी त्याने २ कोटी रुपये मानधन घेतल्याची चर्चा आहे.


# 'धुरंधर'चे तिकीट ऑनलाइन खरेदी करण्यापूर्वी 'या' गोष्टी करा, वाचतील तुमचे पैसे...




**आदित्य धरच्या धुरंधर चित्रपटाचा नवीन भाग, 'धुरंधर द रिव्हेंज' प्रचंड चर्चेत आहे. मोठ्या संख्येने लोक ऑनलाइन तिकीट बुक करत आहेत. अनेकदा ऑनलाइन चित्रपटाची तिकिटे बुक करताना लोक महत्त्वाच्या गोष्टींकडे दुर्लक्ष करतात, ज्यामुळे ते पैसे वाचवू शकत नाहीत. थोडा संयम आणि समज वापरून, तुम्ही स्मार्ट पद्धतींनी ऑनलाइन पैसे वाचवू शकता. यामध्ये पेमेंट ऑफर्स आणि कार्ड पेमेंटचा समावेश आहे.**

» **क्रेडिट-डेबिट कार्ड ऑफर्स तपासा :** आजकाल, लोक UPI पेमेंटला प्राधान्य देतात. हे सोपे आणि जलद आहे. पण हुशार रहा आणि तुमच्या क्रेडिट आणि डेबिट कार्ड ऑफर्स तपासा. आजकाल, HDFC, ICICI आणि Axis Bank सारख्या सर्व प्रमुख बँका त्यांच्या विविध कार्डांवर 'एक तिकीट खरेदी करा, एक मोफत मिळवा' (buy one, get one) तिकीट किंवा कॅशबॅक देतात. काही बँका आठवड्याच्या दिवसांमध्ये, म्हणजेच सोमवार ते शुक्रवार अशा ऑफर्स देतात. या ऑफर्स त्यांच्या बँकेच्या ॲपवर तपासता येतात. UPI पेमेंटसाठी 'स्क्रॅच कार्ड' देखील उपलब्ध आहे, परंतु त्याचे फायदे नगण्य आहेत.

» **सुविधा शुल्कावर (कन्व्हिनियन्स फी) बचत करू शकेन का? :** ही बातमी लिहित असताना मी प्रमुख मूव्ही बुकिंग ॲप्सवर तिकिटे तपासली. धुरंधरच्या रविवारच्या शोच्या तिकिटाची सरासरी किंमत 500 रुपये दाखवत होती, आणि त्यावर सुविधा शुल्क म्हणून अतिरिक्त 80 ते 90 रुपये आकारले जात होते. बचत करण्यासाठी तुम्हाला थोडे अधिक प्रयत्न करावे लागतील. अनेक चित्रपटगृहे सुविधा शुल्क आकारत नाहीत. गिफ्ट कार्ड्स हा देखील सुविधा शुल्कावर बचत करण्याचा एक



मार्ग आहे. जर तुम्ही ॲमेझॉन किंवा इतर वेबसाइट्ससारख्या प्रमुख मूव्ही बुकिंग साइटवरून गिफ्ट कार्ड खरेदी केले, तर बुकिंगच्या वेळी ते जोडल्याने सुविधा शुल्कावर बचत होऊ शकते.

» **आठवड्याच्या दिवसांत स्वस्त तिकिटे उपलब्ध :** बहुतेक लोकांना शनिवार आणि रविवारी सुट्ट्या असतात. आठवड्याच्या शेवटी (वीकेंडला) तिकिटे सर्वात महाग असतात. जर तुम्ही आठवड्याच्या मधल्या दिवशी चित्रपट पाहायला गेलात, तर तुम्हाला ऑनलाइन स्वस्त तिकीटं मिळतील. अनेक चित्रपटगृहं सकाळच्या शोवर सवलत देतात, त्यामुळे तुम्ही याचा फायदा घेऊ शकता. धुरंधरच्या बाबतीत तिकीटं तशी स्वस्त नसली तरी, तिकीट बुकिंग ॲप्सवर नीट शोध घेतल्यास कमी किमतीचा शो सापडू शकतो.

» **सबस्क्रिप्शन घेण्याचा काही फायदा आहे का? :** आजकाल अनेक मूव्ही बुकिंग ॲप्स सबस्क्रिप्शन देतात. PVR ॲप PVR INOX Passport' नावाचे सबस्क्रिप्शन देते. याची किंमत दरमहा 349 रुपये आहे, ज्यामुळे तुम्हाला 30 दिवसांत चार चित्रपट पाहता येतात. मात्र, नवीन चित्रपटांसाठी एक ब्लॅकआउट पीरियड असतो. याचा अर्थ, कोणताही नवीन प्रदर्शित झालेला चित्रपट 14 दिवसांनंतर पाहता येतो. जर तुम्हाला खरोखरच पैसे वाचवायचे असतील, तर तुम्ही अशा प्रकारचे सबस्क्रिप्शन घेऊन एका विशिष्ट कालावधीनंतर, म्हणजेच 14 दिवसांनंतर चित्रपट पाहू शकता.

# भारताने शोधला होर्मुजच्या समुद्रधुनीला सुरक्षित पर्याय



**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – पश्चिम आशियात अमेरिका आणि इस्रायल विरुद्ध इराण असे युद्ध २८ फेब्रुवारी २०२६ पासून सुरू आहे. इराणने होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणाऱ्या जलवाहतुकीवर फास आवळला आहे. कोणत्या देशाचे जहाज होर्मुझच्या समुद्रधुनीतून जावे यावर इराणचे कठोर नियंत्रण आहे. इराणचे हे नियंत्रण अद्याप तसूभरही कमी झालेले नाही. इराणच्या या सामर्थ्यावर हल्ला करण्याचे अमेरिका आणि इस्रायलचे प्रयत्न अद्याप अपेक्षित यश मिळवू शकलेले नाही.

युद्धामुळे भारताला होर्मुझमार्गे होणाऱ्या इंधनाच्या पुरवठ्याला धोका निर्माण झाला होता. पण भारत आणि इराण यांच्यात फोनवरून चर्चा झाली. यानंतर इराणने भारताला तेल आणि गॅसचा पुरवठा करणाऱ्या जहाजांना होर्मुझमधून जाण्याची परवानगी दिली. सध्या या परवानगीमुळे होर्मुझमधून भारताला होणाऱ्या तेल आणि गॅसच्या पुरवठ्याला कोणतीही अडचण नाही. पण भविष्यात युद्धमुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे होर्मुझमधील परिस्थिती बिघडली तर भारताचे ऊर्जास्रोत संकटात सापडू नये यासाठी भारताने होर्मुजच्या समुद्रधुनीला पर्याय असा सुरक्षित सागरी मार्ग शोधला असल्याचे वृत्त रॉयटर्स या वृत्तसंस्थेने दिले आहे. भारतीय तेल शुद्धीकरण कंपन्या पश्चिम आफ्रिका आणि आशिया-पॅसिफिकमधील तेलाकडे वळत आहेत. भारताची सरकारी कंपनी हिंदुस्तान पेट्रोलियमने एका निविदेद्वारे अंगोलाकडून २० लाख बॅरल तेल खरेदी केले आहे. भारत आधी तेल आणि गॅससाठी आखाती देशांवर ४५ टक्के अवलंबून होता. पण पर्याय सापडल्यामुळे आता भारताचे होर्मुझवरील अवलंबित्व कमी होण्यास मदत होणार आहे. रॉयटर्सच्या वृत्तानुसार एचपीसीएलने एक्सॉनकडून दहा लाक बॅरल तेलाची खरेदी केली आहे.

# गुजरातमधील आश्रमात बनावट नोटांचा गोरखधंदा उघड




**अहमदाबाद (प्रतिनिधी)** – नाशिकमधील ज्योतिषी आणि भोंदूबाबा अशोक खरातचं लैंगिक शोषणाचे प्रकरण उघडकीस आल्यानंतर गुजरातमधील अजून एका बाबाचा कारनामा समोर आला आहे. या बाबाच्या आश्रमात गैरप्रकार चालू होता. त्याचे व्हिडिओ समोर आल्यानंतर देशभरात संतापाची लाट उसळली आहे. हा बाबा गुजरातमधील असून अहमदाबाद गुन्हे शाखेने त्याचा कारनामा समोर आणला आहे. या बाबाने सुरत येथे नकली नोटा छापणाऱ्या आश्रमाचा पर्दाफाश केला आहे. पोलिसांनी या आश्रमातून २कोटी रुपयांहून अधिकच्या नोटा जप्त केल्या आहेत.

सुरत जवळील कामरेज तालुक्यातील पारडी गावात 'श्री सत्य योग फाउंडेशन' या आश्रमात बाहेर धर्माचे पांघरूण घेऊन आत नकली नोटांचा गोरखधंदा सुरू होता. या बनावट नोट छापखान्याची माहिती गुन्हे शाखेला एक गुप्त प्रकारे मिळाली होती. त्यानुसार सुरत येथून नकली नोटांची एक मोठी खेप अहमदाबाद येथे आणण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

पोलिसांनी या गुप्त माहितीच्या आधारे अमराईवाडी परिसरात नाकाबंदी केली होती. तिथे काही महिला आणि ६ पुरुषांच्या संशयास्पद हालचाली दिसून आल्या. त्यानंतर पोलिसांनी कारवाई करत त्यांना अटक केली. त्यावेळी त्यांच्याकडून ५०० रुपयांच्या ४० हजारांहून अधिक नकली नोटा हस्तगत करण्यात आल्या. या नोटांची एकूण किंमत जवळपास २ कोटी रुपये आहे. या आरोपींची चौकशी केल्यानंतर सुरत येथील वराछा या परिसरात या नोटा छापण्यात आल्याचे समोर आले. या नोटा बाजारात चालवण्यासाठी खास योजना आखण्यात आली होती. त्यानुसार खरी ५०० रुपयांची नोट द्या आणि १५०० रुपयांच्या नकली नोटा मिळवा,अशी स्कीम होती. या भामट्यांनी ६६ लाख खऱ्या नोटांच्या बदल्यात २ कोटी रुपयांच्या खोट्या नोटा बाजारात आणण्याची योजना आखली होती. पण त्यापूर्वीच पोलिसांनी त्यांचा भांडाफोड केला.

## आता मेट्रो तिकीट 'उबेर' वर; प्रवाश्यांना तिकीटासह मिळणार नवीन सवलती

**मुंबई (प्रतिनिधी)** – मुंबई मेट्रोने प्रवाशांसाठी डिजिटल सुविधांमध्ये आणखी एक पाऊल पुढे टाकले आहे. आता मेट्रोचे तिकीट थेट णलशी पच्या माध्यमातून बुक करता येणार असून या सेवेमुळे मुंबईकरांचा प्रवास अधिक सोपा आणि वेगात होणार आहे.

या आधी मेट्रो प्रवासी तिकीट बुकिंगसाठी यात्री, नवी, ईएमटी, टॅम्पॉक यासारख्या अपवर तिकीट बुकिंग सेवा उपलब्ध होत्या या नव्या सुविधेत ओएनडीसी प्लॅटफॉर्मचे इंटिग्रेशन करण्यात आले असून आता 'उबेर' चीही भर होणार आहे. त्याद्वारे उबर वापरणाऱ्या प्रवाशांना मेट्रो तिकीट सहज उपलब्ध होणार आहे. शिवाय तिकिटांवर काही प्रमाणात सवलतीही मिळणार आहेत.

यापूर्वी 'उबेर' ॲपवरून केवळ वर्सोवा-घाटकोपर या मेट्रो मार्गासाठी तिकीट बुकिंगची सुविधा होती. मात्र आता ही सेवा विस्तारून मेट्रो २ दहिसर पूर्व ते डी एन नगर तर मेट्रो ७ दहिसर पूर्व ते अंधेरी पूर्व या मार्गांवर धावणाऱ्या मेट्रो मार्गांना हि सुविधा लागू करण्यात आली आहे.

# छत्तीसगडमधील बेकायदेशीर सामूहिक धर्मांतरास जन्मठेपेची शिक्षा




**रायपूर (प्रतिनिधी)** – छत्तीसगड विधानसभेने आवाजी मतदानाने 'छत्तीसगड धार्मिक स्वातंत्र्य विधेयक-२०२६' मंजूर करून राज्यातील बेकायदेशीर धर्मांतराच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी एक ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. या विधेयकानुसार, बळजबरी, प्रलोभन किंवा फसवणुकीद्वारे केलेल्या सामूहिक धर्मांतरात दोषी आढळलेल्यांना आता जन्मठेपेची शिक्षा होईल. हा नवीन कायदा विशेषतः महिला, अल्पवयीन, अनुसूचित जाती-जमाती आणि मागासलेल्या वर्गांच्या बेकायदेशीर धर्मांतराच्या प्रकरणांमध्ये २० वर्षांपर्यंतच्या तुरुंगवासाची तरतूद करतो. इतकेच नाही, तर डिजिटल माध्यमांद्वारे दिलेल्या प्रलोभनांसह सर्व संबंधित गुन्हे दखलपात्र आणि अजामीनपात्र करण्यात आले आहेत.

सहा प्रकरणे आणि ३१ मुद्द्यांमध्ये सविस्तरपणे मांडलेल्या या विधेयकाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे, त्यात पूर्वजांच्या धर्मात परत येण्याला धर्मांतराच्या कक्षेबाहेर ठेवण्यात आले आहे. या गंभीर प्रकरणांच्या सुनावणीला गती देण्यासाठी, प्रत्येक जिल्ह्यात विशेष सत्र न्यायालय स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, जेणेकरून राज्याची सांस्कृतिक ओळख आणि धार्मिक स्वातंत्र्य बेकायदेशीर हस्तक्षेपापासून पूर्णपणे संरक्षित राहील. हे विधेयक छत्तीसगड धर्म स्वातंत्र्य विधेयक, १९६८ ची जागा घेईल. मुख्यमंत्री झाल्यानंतर विष्णू देव साई यांनी सक्तीचे धर्मांतर रोखण्यासाठी एक कठोर कायदा लागू केला जाईल, अशी घोषणा केली. विरोधी काँग्रेस पक्षाने या विधेयकाच्या निषेधार्थ सभागृहावर बहिष्कार टाकला. भाजप आमदारांनी समर्थनार्थ 'जय श्री राम'च्या घोषणा दिल्या. धर्म स्वातंत्र्य विधेयक सादर होताच विरोधी पक्षनेते चरण दास महंत यांनी त्याला विरोध केला.

सर्वसाधारण प्रकरण : बेकायदेशीर धर्मांतरासाठी सात ते दहा वर्षांचा तुरुंगवास आणि किमान पाच लाख रुपयांचा दंड. विशेष प्रवर्ग : जर पीडित व्यक्ती अल्पवयीन, महिला, अनुसूचित जाती/जमाती किंवा इतर मागासवर्गीय असेल, तर शिक्षा दहा ते वीस वर्षांचा तुरुंगवास आणि किमान दहा लाख रुपयांचा दंड.

धर्मांतरण प्रक्रिया : धर्मांतर करू इच्छिणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने अधिकृत अधिकाऱ्याकडे अर्ज करणे आवश्यक आहे. त्यानंतर त्या व्यक्तीची माहिती वेबसाइट्स, ग्रामपंचायती आणि संबंधित पोलीस ठाण्यात प्रसिद्ध केली जाईल. दावा/आक्षेप आणि तपास ३० दिवसांच्या आत केला जाईल.

# रेमंडचे मालक गौतम सिंघानिया यांची बोट मालदीवमध्ये उलटली

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – रेमंड ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक गौतम सिंघानिया मालदीवमध्ये स्पीडबोट उलटल्याने जखमी झाले आहेत. या अपघातात सिंघानिया यांना दुखापत झाली असून, त्यांना एअरलिफ्ट करून मुंबईला आणण्यात आले आहे, जिथे त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

त्यांच्यासोबत बोटीत असलेले भारताचे दिग्गज रॅली ड्रायव्हर हरी सिंग आणि त्यांचा एक मित्र अजूनही बेपत्ता आहेत. स्थानिक प्रशासनाला अशी भीती आहे की बराच वेळ झाल्यामुळे त्यांचा जीव गेला असावा. ही घटना गुरुवारी रात्री सुमारे ११ वाजता मालदीवमधील फेलिधू एटोलजवळ घडली. गौतम सिंघानिया यांच्या प्रवक्त्याने सांगितले की, 'गौतम सिंघानिया यांना किरकोळ दुखापती झाल्या आहेत. ते मुंबईत डॉक्टरांच्या देखरेखीखाली आहेत. या अपघातात जखमी झालेल्या आमच्या सर्व मित्रांच्या सुरक्षिततेसाठी आम्ही प्रार्थना करत आहोत.'

गौतम सिंघानिया रेमंड आणि पार्क अव्हेन्यू कंपनीचे मालक आहेत. हा व्यवसाय त्यांचे वडील विजयपत सिंघानिया यांनी सुरू केला होता.

कोस्ट गार्डनुसार हा अपघात किनाऱ्यापासून सुमारे २ नॉटिकल मैल दूर झाला. रात्री सुमारे ११ वाजता बोट अचानक अनियंत्रित होऊन उलटली. स्पीडबोटवर एक कॅप्टन आणि गौतम सिंघानिया यांच्यासह एकूण ७ लोक होते. यामध्ये ५ भारतीय, एक ब्रिटिश आणि एक रशियन नागरिक यांचा समावेश होता.

## मुंबईकरांवर पाणी संकटाची टांगती तलवार

**मुंबई (प्रतिनिधी)** – मुंबईला दरदिवशी होणाऱ्या एकूण पाणी पुरवठ्याच्या निम्म्या पाण्याचे शुद्धीकरण भांडुप संकुलातील जलशुध्दीकरण केले जाते. तिथून मुंबईकरांना याचा पाण्याचा पुरवठा होतो. मात्र, धरणातून येणारे पाणी उचलण्यासाठी तसेच मुंबईला पुरवठा करण्यासाठी याठिकाणी असणाऱ्या पंपिंग स्टेशन्समधील चार पंप जुने झालेत. २० हजार पेक्षा अधिक तास या पंपाचा वापर झाल्यामुळे हे कालबाह्य होवू लागले आहेत. भविष्यामध्ये या पंपाची योग्यप्रकारे दुरुस्ती न झाल्यास मुंबईकरांच्या तोंडचे पाणी पळण्याची शक्यता आहे.

मुंबईला दरदिवशी ४१०० दशलक्ष लिटर पाण्याचा पुरवठा होतो. त्यातील १९१० दशलक्ष लिटर पाण्यासाठी भांडुप संकुलात पंपिंग स्टेशन कार्यरत आहे. १९७८ ते ८०मध्ये हे पंपिंग स्टेशन कार्यान्वित झाले. तेव्हापासून मुंबईला पाण्याचा पुरवठा करण्याकरता हे पंपिंग स्टेशन २४ तास सुरु आहे. या पंपिंग स्टेशनमध्ये २४६ दशलक्ष लिटर प्रतिदिन क्षमतेचे ११ व ८२ दशलक्ष लिटर प्रतिदिन क्षमतेचे ३ पंप कार्यरत आहे.


## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रॅडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८




## Change In Name

My Old Name is Nargis Anjum Asad Khan which now I am changing as New Name Pathan Nargis Anjum Sikandar Ali. Henceforth all my correspondence will be done as per my new name. Please consider the same.

Sign By: Pathan Nargis Anjum Sikandar Ali

Address: Near Malhar Chowk, Amber Garden, Sangvi Budruk, At Post Nanded To Nanded, Taroda Bk., PO: Taroda Bk. DIST: Nanded, Mahiarashtra-431605

Permanent - Near Malhar Chowk, Amber Garden, Sangvi Budruk, At Post Nanded To Nanded, Taroda Bk, B. Po. Taroda Bk. DIST: Nanded, Maliarashtra-431605

# दीर्घ काळापासून प्रलंबित शिक्षक भरतीचा मार्ग अखेर मोकळा



**मुंबई (प्रतिनिधी)** – राज्यातील जिल्हा परिषदा आणि खासगी शिक्षण संस्थांमधील प्रदीर्घ काळापासून प्रलंबित असलेली शिक्षक भरती आता मार्गी लागणार आहे. ही संपूर्ण भरती प्रक्रिया 'पवित्र' पोर्टलच्या माध्यमातूनच राबवली जाणार असून, पात्र उमेदवारांना यामुळे मोठा दिलासा मिळणार आहे. विशेष म्हणजे, भरती प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी खासगी संस्थांना आता रिक्त पदांची माहिती भरण्यापूर्वी मागासवर्गीय कक्ष आणि विभागीय आयुक्तांकडून 'रोस्टर' (बिंदूनामावली) प्रमाणित करून घेणे बंधनकारक करण्यात आले आहे.

शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल आणि 'कास्ट्राईब' शिक्षक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांमध्ये मंत्रालयात झालेल्या बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. या बैठकीत शिक्षकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

शिक्षक भरतीमध्ये होणारे गैरप्रकार रोखण्यासाठी कठोर नियमावली आखून देण्यात आली आहे. खासगी शिक्षण संस्थांना त्यांच्याकडील रिक्त पदांची माहिती पोर्टलवर भरण्यापूर्वी रोस्टर प्रमाणीकरण करून घ्यावे लागेल. ज्या पदांची भरती 'पवित्र' पोर्टलद्वारे होईल, त्यांनाच शासन मान्यता दिली जाईल आणि भविष्यात त्यांना वेतनप्रणाली लागू केली जाईल, असे स्पष्ट संकेत देओल यांनी दिले आहेत. यामुळे वशिलेबाजीला चाप बसून केवळ गुणवत्तेच्या जोरावर पात्र उमेदवारांची निवड होणार आहे. खासगी शाळांमधील 'क' आणि 'ड' वर्गातील अनुकंपा तत्त्वावरील पदेही तातडीने भरली जाणार आहेत. आतापर्यंत प्राप्त झालेल्या १ हजार ४८ प्रस्तावांपैकी ७९१ प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली असून, उर्वरित प्रस्तावांतील त्रुटी लवकरच दूर केल्या जातील. तसेच, खासगी शाळांमध्ये अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे समायोजन आता मानवी हस्तक्षेप टाळून ऑनलाइन पद्धतीने अत्यंत पारदर्शकपणे केले जाणार आहे.

जिल्हा परिषदेच्या केंद्र शाळांचे रूपांतर आता 'समूह शाळां'मध्ये करण्याचा विचार शासन करत आहे. ज्या शाळांची पटसंख्या समाधानकारक आहे, तिथे दहावीपर्यंतचे वर्ग जोडण्याबाबत सरकार सकारात्मक आहे.

### जाहिरप्रगटन

बिलोली येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
ता. बिलोली जि. नांदेड यांचे न्यायालयात,
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र ८०/२०२६** पुढील तारीख – २३.०४.२०२६

अर्जदार : ०१. कौशलाबाई भ्र. गणपतराव कदम,वय–५५ वर्षे, व्यवसाय –घरकाम,
०२. सुर्यकांत पि. गणपतराव कदम , वय –३५ वर्षे, व्यवसाय – नोकरी,
०३. चंद्रकांत पि. गणपतराव कदम, वय –३३ वर्षे, व्यवसाय – शेती,
०४. सविता मारोती बोम्बले , वय – ४२ वर्षे, व्यवसाय – घरकाम,
अर्जदार क्रमांक ०१ ते ०३ रा. नागापूर ता.बिलोली
अर्जदार क्रमांक ०४ रा. पाटोदा थडी , ता. धर्माबाद जि. नांदेड.

**विरुध्द.**

गैरअर्जदारः निरंक

**विषय– वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत..**

ज्याअर्थी अर्जदार क्रमांक ०१ ते ०४ ह्यांनी मा. न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज दाखल केला असून त्यात अर्जदारांचे असे कथन आहे की, अर्जदार क्रमांक ०१ ते ०४ हे **मयत गणपतराव पि. कोंडीबा कदम** यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार क्रमांक ०१ हि **मयत गणपतराव पि. कोंडीबा कदम** यांची पत्नी आहे व अर्जदार क्रमांक ०२ व ०३ हे **मयत गणपतराव पि. कोंडीबा कदम** यांचे मुले आहेत व अर्जदार क्रमांक ०४ हि विवाहित मुलगी आहे. **मयत गणपतराव पि. कोंडीबा कदम** यांचा मृत्यु दिनांक २३/०२/२०२६ रोजी झाला. अर्जदारांनी अर्जामध्ये असे कथन केले की, अर्जदार क्रमांक ०१ ते ०४ यांना **मयत गणपतराव पि. कोंडीबा कदम** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सदरहू अर्जदार यांनी मा. न्यायालयात **सदर मयत** यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. तरी वरील अर्जदार हे **सदर मयत** यांचे कायदेशीर वारस नाहीत असे कोणास समजाविण्याचे असेल अगर **सदर मयत** यांचे कोणी इतर वारस असल्यास त्यांनी या जाहिरप्रगटन प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन किंवा वकीलामार्फत आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत काहीही हरकती न प्राप्त झाल्यास सदरहू अर्जदार हे **सदर मयत** यांचे वारस असल्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू **सदर मयत** यांचे कायदेशीर वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २०/०३/२०२६ रोजी माझ्या सही व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरून,
सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर.,बिलोली.

क. लिपीक
दिवाणी न्यायालय व. स्तर.,बिलोली.


### जाहिरप्रगटन

बिलोली येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
ता. बिलोली जि. नांदेड यांचे न्यायालयात,
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र ८०/२०२६** पुढील तारीख – २३.०४.२०२६

अर्जदार : ०१. कौशलाबाई भ्र. गणपतराव कदम,वय–५५ वर्षे, व्यवसाय –घरकाम,
०२. सुर्यकांत पि. गणपतराव कदम , वय –३५ वर्षे, व्यवसाय – नोकरी,
०३. चंद्रकांत पि. गणपतराव कदम, वय –३३ वर्षे, व्यवसाय – शेती,
०४. सविता मारोती बोम्बले , वय – ४२ वर्षे, व्यवसाय – घरकाम,
अर्जदार क्रमांक ०१ ते ०३ रा. नागापूर ता.बिलोली
अर्जदार क्रमांक ०४ रा. पाटोदा थडी , ता. धर्माबाद जि. नांदेड.

**विरुध्द.**

गैरअर्जदारः निरंक

**विषय– वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत..**

ज्याअर्थी अर्जदार क्रमांक ०१ ते ०४ ह्यांनी मा. न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज दाखल केला असून त्यात अर्जदारांचे असे कथन आहे की, अर्जदार क्रमांक ०१ ते ०४ हे **मयत गणपतराव पि. कोंडीबा कदम** यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार क्रमांक ०१ हि **मयत गणपतराव पि. कोंडीबा कदम** यांची पत्नी आहे व अर्जदार क्रमांक ०२ व ०३ हे **मयत गणपतराव पि. कोंडीबा कदम** यांचे मुले आहेत व अर्जदार क्रमांक ०४ हि विवाहित मुलगी आहे. **मयत गणपतराव पि. कोंडीबा कदम** यांचा मृत्यु दिनांक २३/०२/२०२६ रोजी झाला. अर्जदारांनी अर्जामध्ये असे कथन केले की, अर्जदार क्रमांक ०१ ते ०४ यांना **मयत गणपतराव पि. कोंडीबा कदम** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सदरहू अर्जदार यांनी मा. न्यायालयात **सदर मयत** यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. तरी वरील अर्जदार हे **सदर मयत** यांचे कायदेशीर वारस नाहीत असे कोणास समजाविण्याचे असेल अगर **सदर मयत** यांचे कोणी इतर वारस असल्यास त्यांनी या जाहिरप्रगटन प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन किंवा वकीलामार्फत आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत काहीही हरकती न प्राप्त झाल्यास सदरहू अर्जदार हे **सदर मयत** यांचे वारस असल्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू **सदर मयत** यांचे कायदेशीर वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २०/०३/२०२६ रोजी माझ्या सही व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरून,
सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर.,बिलोली.

क. लिपीक
दिवाणी न्यायालय व. स्तर.,बिलोली.


### नगर परिषद कार्यालय,उमरी जि.नांदेड

Majhi Vasundhara — LiFE Lifestyle for Environment

ULB Code- 802740 जा.क्र. दिनांक 20/03/2026

उमरी नगर परिषद जि.नांदेड मार्फत **माझी वसुंधरा अभियान ६.० व स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत** खालील प्रमाणे विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून स्पर्धा निहाय बक्षिस ठेवण्यात आले आहे.

| अ.क | स्पर्धेचे नांव | दिनांक व वेळ | स्पर्धेचे ठिकाण | स्पर्धेचा विषय | स्पर्धेचा गट | बक्षीस रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | **रन फॉर माझी वसुंधरा 6.0 महा मॅरेथॉन स्पर्धा** | 22/03/2026 सकाळी 7:00 वा. | उमरी येथील श्री.छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा ते चिंचाळा रोड नवीन बायपास चौक ते श्री.छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा पर्यंत (समारोप) | - | - | प्रथम- 15000/- द्वितीय- 11000/- तृतीय- 7000/- चतुर्थ- 5000/- पंचम- 3000/- |
| 2 | **निबंध स्पर्धा** | 23/03/2026 सकाळी 8:00 वा. | यशवंत हायस्कूल उमरी | 1) माझी वसुंधरा अभियान 6.0 2) स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी 2.0) | 5 वी ते 8 वी 9 वी ते 11 वी 12 वी ते पदवी | प्रथम- 5000/- द्वितीय- 3000/- तृतीय- 2000/- (प्रत्येक गटनिहाय) |
| 3 | **वक्तृत्व स्पर्धा** | 23/03/2026 सकाळी 8:30 वा. | | | | |
| 4 | **चित्रकला स्पर्धा** | 23/03/2026 सकाळी 9:00 वा. | | | | |

**नाव नोंदणी चे ठिकाण :-** नगर परिषद कार्यालय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग संपर्क ७४९९६४६७५८, ९४२३७५९३९१, ९८६०२१५३३२

तरी स्पर्धकांनी वरील सुपर्धेत भाग नोंदवावा असे आवाहन नगरपरिषद उमरी जि.नांदेड च्या वतीने करण्यात येत आहे.

**सौ.शकुंतला भगवान मुदिराज**
**अध्यक्षा, न.प.उमरी**

**श्री कैलास श्रीनिवासराव देशमुख**
**उपाध्यक्ष, न.प.उमरी**

**श्री गणेश रामचंद्र चाटे**
**मुख्याधिकारी, न.प.उमरी**

**सर्व सन्माननीय सदस्य नगरपरिषद उमरी जि.नांदेड**

### जाहिरप्रगटन

**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, बिलोली यांचे न्यायालय**
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ६९/२०२६
**अश्वीनी व ईतर विरुध्द निरंक**

**अर्जदार :-** १. अश्विनी भ्र राजेश मुंडकर, वय– २७ वर्षे,
२. हर्षिता पि. राजेश मुंडकर, वय– ०६ वर्षे,
अ.पा.क. अर्जदार क्र.१ आई
दोघे रा. कासराळी ता. बिलोली जि. नांदेड

विरूध्द
निरंक
विषय :– वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत....

ज्याअर्थी अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज सादर केला असुन त्यात असे कथन केले आहे की, मयत **राजेश पि. गणपतराव मुंडकर** यांचे अर्जदार क्र. १ ही पत्नी व अर्जदार क्र. २ ही मुलगी आहे. अर्जदार हे मौजे कासराळी ता. बिलोली जि.नांदेड येथील रहिवाशी आहेत. मयत **राजेश पि. गणपतराव मुंडकर** यांचा मृत्यु दिनांक **दि. २६/१२/२०२५** रोजी –हदय विकाराच्या आजारपणामुळे मृत्यु झाला आहे. मयताची आई व वडील हे त्यांचे मृत्युपुर्वीच मयत झाले आहेत. मयताच्या पश्चात अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस असून इंतर कोणीही मयताचे वारस नाहीत असे अर्जदारांचे म्हणणे आहे.

हे की, मयत **राजेश पि. गणपतराव मुंडकर** यांचे कायदेशिर वारस म्हणुन वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. तरी, उपरोक्त प्रकरणी सर्व संबंधितास कळविण्यात येते की, वरील अर्जदारच्या नावे वारसा प्रमाणपत्र देणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो लेखी स्वरूपात स्वतः हजर राहून अथवा त्यांचे विधिज्ञ यांचे मार्फत **दिनांक २०/०४/२०२६** रोजी किंवा तत्पूर्वी या न्यायालयात सादर करावा. अन्यथा कोणासही कांही आक्षेप/ उजर नाही असे समजुन प्रकरणात पुढील कायदेशीर आदेश निर्गमीत करण्यात येतील.

आज दि. १२ मार्च, २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याने देण्यात आले.

सहा. अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय क.स्तर, बिलोली

### जाहिरप्रगटन

**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, बिलोली यांचे न्यायालय**
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ६९/२०२६
**गंगाराज व ईतर विरुध्द निरंक**

**अर्जदार :-** १. गंगाराज पि. राधेश्याम उत्तरवार, वय– २६ वर्षे,
२. गिरीराज पि. राधेश्याम उत्तरवार, वय– २५ वर्षे,
दोघे रा. कुंडलवाडी ता. बिलोली जि. नांदेड

विरूध्द
निरंक
विषय :– वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत....

ज्याअर्थी अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज सादर केला असुन त्यात असे कथन केले आहे की, मयत **राधेश्याम शंकरराव उत्तरवार** यांचे अर्जदार क्र. १ व २ हे मुले आहेत. अर्जदार हे मौजे कुंडलवाडी ता. बिलोली जि.नांदेड येथील रहिवाशी आहेत. मयत **राधेश्याम शंकरराव उत्तरवार** यांचा मृत्यु दिनांक **दि. २३/०१/२०२६** रोजी अश्विनी हॉस्पीटल येथे उपचारा दरम्यान झाला आहे. मयताची पत्नी नामे मिनाक्षी राधेश्याम उत्तरवार यांचा सुध्दा मृत्यु झाला आहे. मयताचे वडील शंकरराव व आई गंगामणी यांचा मृत्यु मयत राधेश्याम उत्तरवार यांच्या मृत्युपुर्वीचा झालेला आहे. मयताच्या पश्चात अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस असून इतर कोणीही मयताचे वारस नाहीत असे अर्जदारांचे म्हणणे आहे.

हे की, मयत **राधेश्याम शंकरराव उत्तरवार** यांचे कायदेशिर वारस म्हणुन वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. तरी, उपरोक्त प्रकरणी सर्व संबंधितास कळविण्यात येते की, वरील अर्जदारच्या नावे वारसा प्रमाणपत्र देणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो लेखी स्वरूपात स्वतः हजर राहून अथवा त्यांचे विधिज्ञ यांचे मार्फत **दिनांक २९/०४/२०२६** रोजी किंवा तत्पूर्वी या न्यायालयात सादर करावा. अन्यथा कोणासही कांही आक्षेप/ उजर नाही असे समजुन प्रकरणात पुढील कायदेशीर आदेश निर्गमीत करण्यात येतील.

आज दि. १२ मार्च, २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याने देण्यात आले.

सहा. अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय क.स्तर, बिलोली

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६


# गोदातीर समाचार


**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




## महापुरुषांची जयंती डीजेमुक्त आणि व्यसनमुक्त साजरी करणे आवश्यक -महापौर कविता मुळे

**नांदेड (प्रतिनिधी)** – जगातील सर्वश्रेष्ठ संविधान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या देशाला दिले. अशा म हामानवाची जयंती साजरी करताना त्यांना अभिप्रेत असलेल्या पद्धतीने जयंती साजरी व्हायला हवी. महापुरुषांच्या जयंत्या डीजेमुक्त आणि व्यसनमुक्त साजऱ्या होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन महानगरपालिकेच्या महापौर कविता मुळे यांनी केले. डीजेमुक्त जयंती साजरी करणाऱ्या जयंती मंडळांना बक्षीस देणे हा स्तुत्य उपक्रम असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.



नांदेड येथील मराठी नाऊ फाउंडेशन आणि समृद्ध जीवन प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने डीजेमुक्त जयंती साजरी करणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मंडळांना दि. २० मार्च रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत पारितोषिकाचे वितरण करण्यात आले. यावेळी त्या बोलत होत्या. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी नांदेड मनपाच्या महापौर कविता मुळे तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, डीएसबीचे पोलीस निरीक्षक सूर्यकुमार बोलमवाड, शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेश पुरी आणि आयोजक इंजि. प्रवीण खंदारे, प्रा. डॉ. सिद्धोधन एडके यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना महापौर कविता मुळे म्हणाल्या की, सध्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शिवाजी महाराज या महापुरुषांना एका चौकटीत ठेवता कामा नये. कारण त्यांनी संपूर्ण मानव जातीसाठी कार्य केले आहे. सध्या होत असलेल्या महापुरुषांच्या जयंती आपणांस विचार करण्यास भाग पाडणारे आहेत. व्यसनी होऊन डीजेच्या तालावर नाचणे ही बाब महापुरुषांना अपेक्षित नव्हती येणारी पिढी आदर्श पिढी घडायला हवी. त्यामुळे व्यसनमुक्त आणि डीजेमुक्त महापुरुषांच्या जयंतीसाठी पुढाकार घेणे समाजाची जबाबदारी असून, या दोन्ही संस्थेने घेतलेला हा उपक्रम अतिशय स्तुत्य आहे. कार्यक्रमाच्या प्रारंभी मराठी नाऊ फाउंडेशनचे इंजि. प्रवीण खंदारे यांनी प्रास्ताविकात उपक्रमाबद्दल माहिती दिली.

यावेळी सन २०२५ या वर्षात डीजेमुक्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मिरवणूक काढल्याबद्दल माता रमाई बुद्ध विहार येथील जयंती मंडळाचे अध्यक्ष प्रसेनजित मांजरमकर यांना रोख ११ हजार व सन्मान चिन्ह तर दुसरे बक्षीस एसटी महामंडळ वर्कशॉप येथील जयंती मंडळांना रोख ५ हजार व सन्मानचिन्ह विभाग नियंत्रक डॉ. चंद्रकांत वडजकर व त्यांच्या सहकाऱ्यांना देण्यात आले. तिसरा क्रमांक बळीरामपूर येथील जयंती मंडळाला जाहीर करण्यात आला. मान्यवरांच्या उपस्थितीत बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी विविध मान्यवरांची उपस्थिती होती.

### उल्लेखनीय उपक्रम -अबिनाश कुमार

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य समाजासाठी प्रेरणादायी आहे. त्यांची जयंती १८ तास अभ्यास करून साजरी करण्याचे उपक्रम राबविले जातात, परंतु सध्या डीजेमध्ये व्यसन करून क्राईम करणे ही बाब घडत आहे, हे रोखण्यासाठी पोलीस नेहमीच आपले कार्यकर्ते आणि या दोन्ही प्रतिष्ठानने डीजेमुक्त जयंती मंडळाला बक्षीस देऊन समाजामध्ये एक चांगला पायंडा पाडला आहे. हा उपक्रम समाजासाठी दिशादर्शक आहे, असे मत जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी यावेळी व्यक्त केले.

## पिंपळगाव (निमजी), वाहेगाव, भनगी, गंगाबेटावर ग्रामीण पोलिसांची कारवाई

### १ कोटी ६५ लाख ४६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)**– तालुक्यातील पिंपळगाव (निमजी), वाहेगाव, भनगी आणि गंगाबेट गोदावरी नदीतून अवैध वाळू उपसा करणाऱ्यांवर कारवाई करून जवळपास दीड कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईत ८ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान पोलिसांनी अवैध वाळू उपसा करणारे साहित्य जिलेटीन स्फोटाने उद्ध्वस्त केले आहे.



नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांना माहिती मिळाली की, त्यांच्या हद्दीतील पिंपळगाव निमजी, भनगी, वाहेगाव, गंगाबेट या ठिकाणी अवैध वाळू उत्खनन करण्यात येत आहे. यावेळी पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोळकर यांच्या मार्गदर्शनाखाली पहाटे सहा वाजता पोलिसांनी अवैध वाळू उपसा करणाऱ्या या वाळू घाटांवर कारवाई करण्यास सुरुवात केली. पोलिसांनी घटनास्थळावरुन फायबर बोट, लोखंडी बोट, इंजिन तराफे, वाळू असा १ कोटी ६५ लाख ४६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पोलिसांनी अवैध वाळू उपसा करणारे सर्व साहित्य जिलेटीन स्फोटाने उद्ध्वस्त केले आहे.

याबाबत ग्रामीण पोलीस ठाण्यात तेतर श्रावण चौधरी, राधेश्याम कैलास चौधरी, रंजित राजेश्वर यादव, शिवसदन सुकट बीत, सर्व रा. बिहार, सचिन मोरे, आदिनाथ मोरे मालक, प्रताप मोरे मालक, रा. भनगी, नामदेव व्यंकटी मोरे हायवा चालक रा. वडेपुरी ता. लोहा या ८ जणांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरील कारवाई पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अप्पर पोलीस अधीक्षक सुरज गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, पोलीस उपनिरीक्षक व्यंकट कुसमे, पोलीस अंमलदार पंचलिंग, गवेंद्र सिरमलवार, शंकर माळगे, हनवता कदम, समीर, चावरे यांनी केली. अवैध वाळू उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी अशा कारवाया पुढेही सुरू राहणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

## नांदेड परिक्षेत्रात गुटखाविरोधी मोहीम; ८ लाखांचा मुद्देमाल जप्त, ९ जण गजाआड



**नांदेड (प्रतिनिधी)** –१६ ते ३१ मार्च, २०२६ दरम्यान पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी नांदेड परिक्षेत्रात गुटखा व प्रतिबंधित तंबाखूजन्य पदार्थांविरुद्ध व्यापक मोहीम उघडली आहे. या कारवाईत ९ जणांना गजाआड करण्यात आले असून, ८ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

कॅन्सरसारख्या दुर्धर रोगांपासून नागरिकांचा बचाव व्हावा या दृष्टिकोनातून ही मोहीम राबविण्यात येत आहे. सदर मोहिमेच्या पाचव्या दिवशी गुटखा विक्री, साठवणूक व वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध आणखी ५ गुन्हे नोंदवत, अशा व्यवसायांत गुंतलेल्या ९ आरोपींना पोलिसांनी गजाआड केले आहे.

सदर मोहिमेअंतर्गत, नांदेड जिल्ह्यातील भाग्यनगर, मुखेड व परभणी जिल्ह्यातील बोरी, लातूर जिल्ह्यातील उदगीर ग्रामीण व हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ अशा पाच पोलीस ठाण्यांनी या कारवाया केल्या आहेत. यात कलम १२३, भारतीय न्याय संहितेअंतर्गत ९ आरोपींविरुद्ध एकूण ५ गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. सदर गुन्ह्यांत निष्पन्न झालेल्या आरोपीतांकडून एकूण ८,४२,०९० रुपये किंमतीचा गुटखा व अन्य साहित्य जप्त करण्यात आले आहे.

सदर मोहिमेदरम्यान स्वादिष्ट/सुगंधित तंबाखू, अपमिश्रके युक्त चघळण्याची तंबाखू, स्वादिष्ट/सुगंधित सुपारी, गुटखा, पानमसाला, खर्रा, मावा व तत्सम पदार्थांची साठवण, वितरण व वाहतूक या विरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १२३ अन्वये कारवाई करण्यात येत आहे.

उपरोक्त पदार्थांच्या संदर्भात संबंधितांविरुद्ध कलम १२३ बी.एन.एस. अन्वये करण्यात आलेल्या कारवाईचा खटला हा सत्र न्यायालयात चालणारा असून, त्यास दहा वर्षांपर्यंतच्या कारावासासह द्रव्यदंडाची देखील शिक्षा असल्याने पोलिसांच्या या कारवाईचे दृश्य परिणाम दिसून येत आहेत.

अवैध व्यवसायांची माहिती थेट पोलिसांना पोहोचाविता यावी, या दृष्टिकोनातून पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयाने ९१ ५० १०० १०० हा मोबाईल क्रमांक असलेली ‘खबर’ नावाची हेल्पलाइन सुरू केली असून, नागरिकांनी आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती, या क्रमांकावर फोन करून अथवा व्हाट्सअप मेसेजद्वारे पाठवावी, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केले आहे.

## चिखली येथील नरसिंह देवस्थान पांदण वाटिका रस्ता लोकसहकार्यातून कामाला सुरुवात

**नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड तालुक्यातील चिखली बुद्रुक येथील नरसिंह देवस्थान पांदण वाटिका रस्ता या महत्त्वपूर्ण रस्त्याच्या कामाला लोकसहकार्यातून सुरुवात करण्यात आली आहे.



गावातील प्रतिष्ठित मान्यवर, शेतकरी बांधव व ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत तसेच सर्व शेतकऱ्यांनी दिलेल्या वर्गणी व सहकार्यामुळे या कामाचा शुभारंभ उत्साहपूर्ण वातावरणात झाला. हा रस्ता शेतकऱ्यांच्या शेतीच्या कामासाठी तसेच श्री नरसिंह देवस्थानाकडे जाणाऱ्या भाविकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. चिखली बुद्रुक गावाची एक सुंदर परंपरा अशी आहे की, लग्न झाल्यानंतर प्रत्येक नवरदेव-नवरी श्री नरसिंह देवाचे दर्शन घेण्यासाठी येथे जातात. त्यामुळे या रस्त्याचे काम केवळ शेतकऱ्यांसाठीच नव्हे तर धार्मिक व सांस्कृतिक दृष्टीनेही अत्यंत महत्त्वाचे असल्याचे बोलले जाते.

गावकऱ्यांच्या सहकार्याने हे काम लवकर पूर्ण होऊन गावाच्या विकासात एक महत्त्वाची भर पडणार आहे. सदरील ठिकाणी सत्यनारायण मंत्री. माजी सैनिक जनार्दन शेजुळे, गजानन कल्याणकर, बाबुराव शेजुळे, संभाजी शेजुळे, गणाजी तथा पत्रकार गजानन शेजुळे आदी उपस्थित होते.

## आक्षेपार्ह पोस्ट; आरोपीस अटक

**किनवट (प्रतिनिधी)** –इन्स्ट्राग्राम या सोशल मीडियावर महापुरुषांबद्दल आक्षेपार्ह पोस्ट करून दोन समुदायात तेढ निर्माण करू पाहणाऱ्या आरोपीला पोलिसांनी अटक केली आहे.

किनवट तालुक्यातील घोटी येथील समीर तय्यब खान याने त्याच्या इन्स्ट्राग्राम अकाउंटवरून महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल आक्षेपार्ह कमेंट करून दोन समुदायात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करीत शिवप्रेमींच्या भावना दुखावण्याचा प्रयत्न केला.

याप्रकरणी किनवट तालुक्यातील दुधगाव येथील रहिवाशी गोविंद आरसोड यांनी वरील समाजकंटकाविरुद्ध किनवट पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यावरून पोलिसांनी समीर खान याला तातडीने ताब्यात घेऊन त्याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम १९६ (१),२९९, ३५३ (२) प्रमाणे गुन्हा दाखल केला. आरोपीस न्यायालयाने न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. पाच दिवसांपूर्वीच गोकुंदा येथील एका महिलेने अशाच पद्धतीची पोस्ट केल्याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता.

## लोह्यात ‘ईद-उल-फितर’उत्साहात साजरी

**लोहा (प्रतिनिधी)** –लोहा शहरात रमजान ईद निमित्ताने दरवर्षी प्रमाणे यंदाही इदगाह व शहरातील मध्यवर्ती भागातील जामा मस्जिद येथे नमाज अदा करण्यात आली. त्यानंतर मुस्लीम बांधवांनी एकमेकांना आलिंगन देत ईद की दुवा मागीतली तर हिंदु बांधवांनी सुद्धा आलिंगन देत शुभेच्छा दिल्या.



यावेळी इदगाह येथे प्रवीण पाटील चिखलीकर यांनी उपस्थितीत सर्व बांधवांचे स्वागत केले व शुभेच्छा दिल्या. सामाजिक एकोपा व बंधुभाव याची शिकवण देणारा हा सण आहे. आपण सर्वजण गुण्यागोविंदाने नांदत एकमेकांच्या उत्साहात सहभागी होत असतो अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या. नगराध्यक्ष शरद पाटील पवार यांनी रमजान ईद निमित्ताने मुस्लीम बांधवांना शुभेच्छा दिल्या.

लोहा शहरात रमजान ईद म्हणजे ईद उल फितर मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. तीस दिवसांचे रोजे संपल्यानंतर मुस्लीम बांधवांनी शनिवारी मोठ्या आनंदात एकमेकांना आलिंगन देत रमजान सण साजरा केला.

दरवर्षीप्रमाणे यंदाही जुन्या शहरातील तांड्याकडे जाणाऱ्या मार्गावरील इदगाह येथे रमजान ईद निमित्ताने सकाळी नमाज अदा करण्यात आली. त्यानंतर सर्व बांधवांनी एकमेकांना आलिंगन दिले. युवा नेते प्रवीण पाटील चिखलीकर, नगराध्यक्ष शरद पाटील पवार, सचिन पाटील चिखलीकर, माजी नगराध्यक्ष किरण वट्टमवार, माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकदम, उपनगराध्यक्ष करीम शेख, माजी उपनगराध्यक्ष दत्ता वाले, नगरसेवक हरिभाऊ चव्हाण, पोलीस निरीक्षक नागनाथ आयलाने, पीएसआय पाटील, डीएसबीचे सदाशिव जामकर यांच्यासह अनेकांनी मुस्लीम बांधवांना शुभेच्छा दिल्या. उपनगराध्यक्ष करीम शेख, मस्जिद सदर निहाल मन्सुरी, खादरसाब, सलीम शेख, पटेल, चांद शेख, सिंकदर शेख, नबीसाब पठाण यांच्यासह मोठ्या संख्येने मुस्लीम बांधव सहभागी झाले होते.

## परवानानगरच्या गणेश मंदिरात आज श्रीराम भजन संध्या

**नांदेड (प्रतिनिधी)** – येथील परवानानगरच्या गणेश मंदिरात रविवार, दि. २२ मार्च रोजी सायंकाळी छतेर या दरम्यान श्रीराम भजन संध्येचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमात सुशांत पांडे आणि सहकलाकार श्रीराम भक्तीपर गीते सादर करणार आहेत. गणेश मंदिर व्यवस्थापन समितीच्या वतीने आयोजित श्रीराम जन्मोत्सवाचा एक भाग म्हणून भजनसंध्येचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवांतर्गत दि. २२ मार्चपासून रामचरितमानस या ग्रंथाचे रूपेश गुरु ब्रारा वाचन व निरुपण याचाही समावेश आहे. भाविकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन व्यवस्थापन समितीच्यावतीने करण्यात आले आहे.

## भोकरमध्ये ईद उत्साहात साजरी; पोलिसांचा चोख बंदोबस्त



**भोकर (प्रतिनिधी)**– भोकर शहरात रमजान ईदचा सण अत्यंत उत्साहात आणि आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी शहरातील सामाजिक सलोख्याचे दर्शन घडले असून, हिंदू-मुस्लीम बांधवांनी एकमेकांची गळाभेट घेऊन ईदच्या शुभेच्छा दिल्या. या सणानिमित्त शहरात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस प्रशासनाच्या वतीने पोलीस निरीक्षक अजित कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली चोख बंदोबस्त लावण्यात आला होता.

रमजान ईदच्या पार्श्व-भूमीवर १८ मार्च २०२६ रोजी भोकर शहरातील मिश्र वस्ती व मुख्य बाजारपेठेतून ‘रूट मार्च’ काढण्यात आला. हा मार्च डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, तहसील कार्यालय परिसर, छत्रपती शिवाजी महाराज चौक, बसस्थानक, लहुजी वस्ताद साळवे चौक आणि उमरी रोडवरील ईदगाह परिसर या मार्गे काढण्यात आला.

शहरातील शांतता अबाधित राखण्यासाठी मोठा पोलीस फौजफाटा रस्त्यावर उतरला होता. यामध्ये पाच पोलीस अधिकारी आणि दहा अंमलदार, एसआरपीएफची एक प्लाटून, पंचवीस होमगार्ड, पोलीस निरीक्षक अजित कुंभार यांनी स्वतः या बंदोबस्ताचे नियोजन केले असून, ईदच्या निमित्ताने शहरात कुठेही अनुचित प्रकार घडू नये यासाठी जागोजागी गस्त वाढवण्यात आली होती. सर्वत्र आनंदाचे वातावरण असून, बंधुभावाच्या या सणात नागरिकांनी मोठ्या उत्साहात सहभाग नोंदवला.

## किनवटमध्ये २७.६६ कोटींच्या निधीतून पोलिसांसाठी ७० सुसज्ज निवासस्थाने; आ. केराम यांच्या हस्ते भूमिपूजन

**किनवट (प्रतिनिधी)** –गुढीपाडव्याच्या मुहुर्तावर दि. १९ मार्च रोजी येथील पोलीस कर्मचाऱ्यांसाठी उभारण्यात येणाऱ्या निवासी इमारतीच्या बांधकामाचे भूमिपूजन आ. भीमराव केराम यांच्या हस्ते विधिवत पूजन करून करण्यात आले. यावेळी पोलीस निरीक्षक गणेश कराड, पोलीस विभागातील अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिक उपस्थित होते.

किनवट येथील पोलीस दलासाठी सुसज्ज व आधुनिक निवासस्थाने उभारण्याच्या महत्त्वपूर्ण प्रकल्पाला शासनाची मंजुरी मिळाली असून, तब्बल २७ कोटी ६६ लाख ४ हजार ४७२ रुपयांचा निधी उपलब्ध झाला आहे. आमदार केराम यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा निधी मंजूर झाला आहे.

यावेळी बोलताना आ. केराम म्हणाले की, पोलीस दल हे समाजाच्या सुरक्षेचे भक्कम आधारस्तंभ आहे. त्यांना सुरक्षित, सुसज्ज आणि सन्मानजनक निवास मिळणे ही शासनाची जबाबदारी आहे. किनवटच्या पोलिसांसाठी आधुनिक सुविधा असलेली निवासस्थाने उभारली जाणार असून, या प्रकल्पामुळे त्यांच्या निवासाचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागेल. विकासकामांमध्ये सातत्य ठेवत नागरिकांना प्रत्यक्ष दिलासा देणे हेच आमचे ध्येय आहे, असेही त्यांनी यावेळी नमूद केले.



या प्रकल्पांतर्गत पाच मजली इमारत उभारण्यात येणार असून, त्यामध्ये एकूण ७० निवासी सदनिका असतील. त्यापैकी ६ निवासस्थाने पोलीस अधिकाऱ्यांसाठी तर ६४ निवासस्थाने पोलीस कर्मचाऱ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून, कंत्राटदाराला कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे. भूमिपूजनानंतर प्रत्यक्ष बांधकामाला सुरुवात झाली आहे. पुढील १८ महिन्यांत काम पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या प्रकल्पामुळे पोलिसांच्या निवासाची दीर्घकालीन समस्या सुटणार असून, स्थानिक पोलीस दलाच्या कार्यक्षमतेतही मोलाची भर पडणार आहे. नागरिकांकडून या उपक्रमाचे स्वागत होत आहे.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ — ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com